# *तुटलेली हौद*

प्रभू, मी विश्वास करतो, प्रभू, मी विश्वास करतो,
सर्व गोष्टी शक्य आहेत, प्रभू, मी विश्वास करतो.

आपण काही क्षण उभे राहूया आणि आपली डोके झुकवूया.

2 प्रभू येशू, आम्ही आमच्या नम्र पद्धतीने, हे गाऊन, तुला व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहोत, की आम्ही विश्वास करतो. आणि आम्ही प्रार्थना करतो, प्रभू, की आता, की तू आम्हाला जीवनाची भाकर सतत तोडून देत राहशील, आम्हास ज्याची गरज आहे, ते तुझ्या वचनातून देत राहा. कारण आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन.

3 तुम्ही बसा. मला पूर्ण खात्री आहे की, जर आपण करावे, जर मी आता *आमेन* हे सर्वसमाधानकारक शब्द उच्चारले, की देवाचे महान आशीर्वाद अजूनही ह्या प्रेक्षकांवर राहतील.

4 मी आज सकाळी बसून सभा बारकाईने ऐकली आहे, साक्षांचा आनंद घेतला, प्रत्येकांकडे आपल्याला व्यक्त करण्याची वेगवेगळी पद्धत आहे. आणि नवागतांचे बोलणे ऐकणे, येथील बाप्तिस्ट बंधू ज्यांनी थोडेसे चुकीचे विचार केल्याबद्दल क्षमा मागण्यासाठी आले. म्हणून मी—मी मनुष्याचे नक्कीच कौतुक करतो, कोणीतरी जो इतका मानवी राहू शकतो, किंवा—किंवा एवढा सज्जन की, जर त्याला वाटले की त्याने चूक केली आहे. त्याने नेमकं मला माफी मागितली नाही, तो माझ्याकडे माफी मागत नव्हता, तर देवाकडे मागत होता. म्हणून मी—मी त्याचे कौतुक करतो, पाहा. परमेश्वर आपल्या भावाला, आणि त्याच्या सुवार्तिक भावाला आशीर्वादित करो.

5 माझ्या प्रभू, तो बॅप्टिस्ट, तुम्हाला माहीत आहे, मी पण बॅप्टिस्ट मंडळीचा होतो. मी मिशनरी बॅप्टिस्ट मंडळीचा सदस्य होतो. जेव्हा मी लोकांमध्ये येतो, मला माहीत आहे तुम्हाला कसे वाटते. मलाही असेच वाटले, मला—मला ठाऊक नव्हते अशा गोष्टींनी भरलेले.

6 मला आठवते पेंटेकॉस्टल पाहण्याचा माझा पहिला अनुभव, तो डोवागियाक, मिशिगन इथे होता…क्षमा करा, मी डोवागियाक इथे मासेमारीच्या सहलीवर होतो, आणि डोवागियाकहून, इंडियाना इथे येत होतो. आणि म्हणून मी "येशूची" नावे सर्व गाड्यांमध्ये आणि गोष्टींमध्ये पाहिली, आणि मी त्या दिवशी त्यांच्या सभा ऐकल्या. आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी मला मंचावर येण्यास सांगितले, काही शब्द बोलण्यासाठी, आणि मी तसे केले. आणि मी…त्यांनी मला विचारले मी कोणत्या मंडळीचा आहे, आणि मी त्यांना सांगितले मी बॅप्टिस्ट आहे.

7 आणि त्या रात्री त्यांच्याकडे एक वृद्ध अश्वेत मनुष्य प्रचार करणार होता, आणि तो नक्कीच ऐंशीच्या पुढे वयाचा असावा, आणि तो मंचावर आला. वृध्द व्यक्ती, त्यांना जवळजवळ त्याला बाहेर घेऊन जावे लागले. त्याने, एखादा लांब उपदेशकांचा कोट घातला होता, मखमली कॉलर असलेला, आणि बाजूला फक्त थोडासा पांढऱ्या केसांचा कडा होता. आणि मला वाटले, "हे सर्व मनुष्य आणि धर्मशास्त्री, महान मनुष्य, त्यांनी ही सेवा अशा व्यक्तीला कशी देऊ केली? तो वृद्ध व्यक्ती कुठेतरी खाली खुर्चीत, बसलेला असावा."

8 ते त्या दिवशी येशूने पृथ्वीवर काय केले त्याविषयी प्रचार करत होते. आणि, पण तो घेतो, त्यांनी आपला विषय घेतला, मला वाटते तो ईयोब :७, २० मधून होता, तरी, मला खात्री नाही की नेमका तोच शास्त्रलेख आहे. तथापि, हा उद्धृत भाग आहे, किंवा त्याचा काही अंश आहे, “मी जगाचा पाया घातला तेव्हा तू कुठे होतास, जेव्हा पहाटेच्या ताऱ्यांनी गायन केले, आणि देवाच्या पुत्रांनी आनंदाने जयजयकार केला?” आणि तो स्वर्गात काय घडले ह्यावर बोलला, तर इतर पृथ्वीवर काय घडले ह्यावर बोलत होते.

9 आणि कुठेतरी, तो बोलल्यानंतर साधारण पाच मिनिटात, तो, प्रभूचा आत्मा त्याच्यावर उतरला, आणि त्याने जमिनीवरून खूप वर उडी मारली आणि त्याने आपल्या टाचा एकत्र ठोकल्या. माझ्या देवा, तिथे खूप जागा होती, तिथे मंचावर जवळजवळ अर्धी जागा होती; आणि तो चालत गेला, म्हणाला, “तुमच्याकडे इथे मला प्रचार करण्यासाठी पुरेशी जागा नाही.”

10 तेव्हा मी अंदाजे वीस वर्षांचा होतो. मी विचार केला, “जर—जर ते त्या वृद्ध माणसासाठी असं करू शकतं, तर ते माझ्यासाठी काय करील?” पाहिले?

11 आपल्या नविन भावांसाठी सर्वकाही व्यवस्थित ठेवण्याकरिता, आम्ही त्यांचे आमच्या संगतीत स्वागत करतो. समजले, मला वाटते त्यांनी इथे एका याजकाचा उल्लेख केला होता, मला वाटते; अर्थातच, आयरिश असल्यामुळे, माझे लोक कॅथलिक आहे. आणि मग तिथे अजून काही होते, बॅप्टिस्ट आणि इतरही. थोड्या वेळापूर्वी, तुम्ही कदाचित थोडे गोंधळले असाल. मी पाहिले की कोणीही भाऊ त्याविषयी बोलले नाही, परंतु मला वाटले की मी सुधार करण्याचा प्रयत्न करीन. जेव्हा भाऊ शेकेरियन...इथला उत्तम वक्ता इतका आनंदाने भरल्यानंतर, हे जाणून की प्रभूचे आगमन खूपच जवळ आहे, तो—तो आपल्याशी, अन्य भाषेत बोलला. आणि आपल्याकडे अनुवादक आहेत जे अनुवाद करतात. जसे, शास्त्रलेख म्हणते, “जर तिथे कोणी अनुवादक नसेल, तर त्यांनी शांतता राखावी.” परंतु जर—जर ते अन्य भाषेत बोलतात आणि नंतर त्याचा अनुवाद करतात, तर ती भविष्यवाणी बनते. म्हणून त्या दोघांचा—चा एकावेळी येणे थोडासा गोंधळ झाला. आता, त्यात अजिबात गोंधळ नव्हता, पाहा; कारण, त्यांच्यातील एकजण अर्थ सांगत होता, दुसरा भविष्यवाणी करत होता. पाहिले? तर ते...

12 मला वाटले की मी आपल्या भावांना समजावे, जर त्यांना समजले नाही, कारण त्यांच्यातील एक जण योग्यरितीने सांगत होता...तुम्ही प्रत्येकाच्या वेळेची मर्यादा पाहिली का? आणि दुसरा इतका भरला होता, स्वतः, की देवाचा आत्मा एकाद्वारे भविष्यवाणी करत होता; अनुवाद करत होता, दुसरा अनुवाद करत होता. ह्यासाठी की हे स्पष्ट व्हावे, की तुम्ही...आम्ही नाही...कधीकधी, स्वभाविक मनासाठी...अगदी आपल्या मौल्यवान भावाप्रमाणे ज्याने आज सकाळी क्षमा मागितली. ज्याला समजत नाही त्याच्यासाठी हे थोडा गोंधळ वाटतो. परंतु जे त्यात आहेत, आपण ज्या लढाईत आहोत त्याचे जुने योद्धे, का, आपण जाणतो की, ह्या गोष्टी काय आहेत. म्हणून मी विचार केला की मी त्याविषयी काही बोलेन, जर ते ठीक असेल तर.

13 आता, मला—मला ठाऊक आहे की हे सांगण्याची ही जागा नाही. परंतु सगळेजण थोड्या थोड्या गोष्टी सांगत आहे म्हणून, मी...तुम्हाला माहीत आहे, त्या वृध्द आफ्रिकी माणसाने म्हटले, “तुमच्याकडे मला प्रचार करण्यासाठी पुरेशी जागा नाही.” तुमच्याकडे मला प्रचार करण्यासाठी पुरेसा *वेळ* नाही. [मंडळी टाळ्या वाजवते—सम्पा.] थोडासा लांबलचक.

14 एके दिवशी एक व्यक्तीने सांगितले, “एक सेवक आला, तो वीस वर्षांपासून मंडळीमध्ये पाळक होता. आणि तो नेहमी प्रत्येक रविवारी सकाळी अगदी तीस मिनीटे त्याच्या मंडळीमध्ये प्रचार करीत असे.” आणि तो म्हणाला, “या रविवारी सकाळी, त्याने तीन तास प्रचार केला.”

15 आणि म्हणून डिकन मंडळाने त्याला आत बोलावले, आणि म्हणाले, “पाळक, आम्ही खरोखर तुमचे कौतुक करतो.” म्हणाले, “आम्हाला हे सदैव ठाऊक आहे की—की तुम्ही बायबल आणि त्याच्या अधिकारांसाठी उभे राहता.” आणि नंतर म्हणाले, “आणि तुम्ही नेहमीच आमचा सुधार करतात यासाठी की आम्ही देवापुढे शुद्ध आणि पवित्र राहू शकू. आणि आम्ही खरोखर तुमची प्रशंसा करतो, आणि आमचा विश्वास आहे की तुम्ही देवाचे सेवक आहात. आणि आज सकाळी आम्ही निश्चितच त्या संदेशाचे कौतुक केले. पण,” म्हटले, “आम्हाला फक्त एकच गोष्ट विषयी तुम्हाला विचारायचे आहे.” म्हटले, “आम्ही तुम्हाला डिकन मंडळ म्हणून, वेळ दिला आहे.” म्हटले, “प्रत्येक रविवारी सकाळी तुम्ही अगदी तीस मिनिटेच घेतात, आणि आज तुम्ही तीन तास घेतले.” म्हणाले, “आता, लक्षात ठेवा, आम्ही त्या प्रत्येक गोष्टीची प्रशंसा करतो. ते सर्व ठीक होते.” वृध्द व्यक्तीला बरे वाटून देणे, तुम्हाला माहीत आहे.

16 त्याने म्हटले, “भावांनो, मी तुम्हाला सांगतो की ते कसे आहे.” म्हणाला, “प्रत्येक सकाळी जेव्हा मी जातो...मला मंचावर बोलावले जाते,” तो म्हणाला, “मी त्या लहान जीवनरक्षकांपैकी एक माझ्या तोंडात ठेवतो,” तो म्हणाला, “आणि मी फक्त त्यावर चोखत राहिलो.” आणि म्हटले, “जेव्हा तो जीवन रक्षक संपतो,” म्हणाला, “त्याला फक्त तीस मिनिटे लागतात,” आणि म्हणाला, “मग मी प्रचार करणे थांबवतो.” तो म्हणाला, “तुम्हाला ठाऊक आहे, आज सकाळी, मला वाटले मी थोडा जास्त वेळ घेतला. मी ते थुंकून टाकले, माझ्या तोंडात एक बटण होते.”

17 मी काहीही घालणार नाही, म्हणून आम्ही आशा करतो की आमच्या खिशात काही बटणे मिळणार नाहीत. परंतु आपण...मला आशा आहे की हे इथे अपवित्र वाटले नाही. परंतु मी फक्त...तुम्हाला माहीत आहे, देवालाही विनोदाची भावना आहे, तुम्हाला माहीत आहे.

18 म्हणून आम्ही इथे असण्याबद्दल आणि ही संगतीची वेळ मिळाल्याबद्दल फार आभारी आहोत, आणि—आणि या महान सौभाग्याने पुन्हा एकदा जीवनाची भाकरी तोडण्याची संधी मिळाली, माझ्या स्वतःच्या साध्या छोट्याशा पद्धतीने. मला ठाऊक आहे, एक धर्मशास्त्र ज्ञानी म्हणून, जसे काल रात्री इंग्लंडहून आलेल्या त्या माणसाने इथे बोलले; माझ्या देवा, सातव्या–इयत्तेच्या शिक्षणासह, अशा व्यक्तीच्या मागे येऊन उभे राहणे मला कठीण वाटते. पण मला आशा आहे की परमेश्वर तुम्हाला माझ्या हृदयातील अर्थ सांगेल. पाहिले? जर माझे शब्द बरोबर नाहीत, माझा—माझा विश्वास आहे, माझे हेतू, बरोबर आहेत.

19 आता आपण शस्त्रलेखात वाचूया. तुमच्यातील अनेकांना अनुसरण करायला आवडते. आणि मी आज सकाळी, काही क्षणांसाठी, यिर्मया, संदेष्ट्याच्या पुस्तकातून वाचणार आहे, 2रा अध्याय, आणि मी आता 1ल्या वचनापासून सुरुवात करणार आहे.

*परमेश्वराचे वचन माझ्या कडे आले आणि, म्हणाले,*

*जा आणि यरुशलेमेच्या कानामध्ये अशी घोषणा कर, परमेश्वर असे म्हणतो; तुझ्याविषयी तुझ्या तरुणपणाची निष्ठा,* आणि *तुझ्या* वाडनिश्चयाची *प्रीती,*

*हे माझ्या ध्यानात आहे, जेव्हा तुम्ही वाळवंटातून,* आणि *पडीत जमिनीतून माझ्या मागे आलात,*

*इस्राएल परमेश्वरासाठी पवित्रता आणि त्याच्या उत्पन्नाचे प्रथमफळ होते: जो कोणी या प्रथम फळातील खातो*...आणि *तो पाप करतो; त्यांच्यावर संकटे येतील, असे* ***परमेश्वर*** *म्हणतो.*

*याकोबाच्या घराण्यांनो, आणि इस्राएलच्या घराण्याच्या सर्व कुटुंबांनो, परमेश्वराचे वचन ऐका:*

*परमेश्वर असे म्हणतो, तुमच्या पूर्वजांना माझ्यामध्ये असे काय चुकीचे आढळले, जे ते माझ्यापासून दूर गेले* आहेत, *आणि कवडी मोल दैवतांच्या मागे जाऊन, ते पण स्वतः कवडीमोल झाले?*

*कारण ते असेही म्हणाले नाहीत की, ज्याने आम्हाला मिसरहून आणले तो परमेश्वर कोठे आहे,* आणि *ज्याने आम्हाला रानांतून पार नेले,* ओसाड *आणि खडकाळ प्रदेशातून, काळोख, व धोका असलेल्या, निर्जल, जेथुन कोणीही प्रवास करीत नाही* अशा *प्रदेशातून आम्हांला पार नेले, आणि*... *कोणीही मनुष्य* राहत *नाही?*

*आणि मी तुम्हाला कर्मेलाच्या भूमित आणले, ह्यासाठी की तुम्ही तिचे फळ आणि इतर चांगल्या गोष्टीं खाव्या; परंतु जेव्हा तुम्ही आले, तरीही तुम्ही माझी ही भूमी वितळवीली, आणि* माझा *वारसा तुम्ही घृणास्पद केला.*

आणि *याजकांनी, परमेश्वर कोठे आहे? विचारले नाही. आणि नियमशास्त्रातील ते तज्ञानींनी मला ओळखले नाही:* आणि *राज्यकर्त्यांनी माझ्याविरुध्द अपराध केला, आणि संदेष्ट्यांनी बआलच्या नावाने याचे नावे भविष्य वर्तविले, आणि निरर्थक गोष्टींच्या मागे लागले.*

म्हणून मी *अजूनही*...*तुझ्यावर दोषारोप ठेवणार आहे आणि तुमच्या नातवंडांनासुद्धा दोषी ठरवीन, परमेश्वर असे म्हणतो.*

*कारण*...ह्या *चित्तीम* देशावर, *आणि पाहा; आणि केदार* मध्ये, *आणि त्याला लक्षपूर्वक पाहा, आणि कोणी असे कधी काही केले आहे का ते बघा.*

काय *राष्ट्रांनी देवांची अदलाबदली केली, जरी ते*...*देव नसले तरी? पण माझ्या लोकांनी जे काही मदत करू* शकत *नाही त्याच्याशी आपल्या महिमेची बदली केली आह.*

*ओह तुम्ही आकाशांनो, घडलेल्या गोष्टीबद्दल तुला आश्चर्याचा धक्का बसू दे, भीतीने* थरकाप होऊ *दे,*...*परमेश्वर असे म्हणतो.*

*कारण माझ्या लोकांनी दोन दुष्कर्मे केली आहेत; जो मी जिवंत पाण्याचा झरा त्यांनी सोडला आहे, आणि त्यांनी आपणासाठी हौद, तुटलेली हौद जो पाणी धरून ठेवू शकत नाही, ते खोदले* आहेत.

20 प्रभू आपल्या वचनाच्या वाचनावर आपले आशीर्वाद जोडू दे. आणि मला त्यावरून, *तुटलेली हौद,* म्हणून एक विषय घ्यायचा आहे.

21 जेव्हा, या सकाळी या शास्त्रलेख वाचताना; जे, सर्व शास्त्रलेख प्रेरणाद्वारे दिलेले आहे. आणि आपण प्रभूच्या घरात सुधारणा आणि समज प्राप्त करण्यासाठी येतो. आणि कधी कधी आपण...एखादी लहान गोष्टी मार्गात पाहतो.

22 जसे हा सैनिक, थोड्या वेळापूर्वी, आमच्याशी बोलत होता आणि काही गोष्टी सांगत होता, की कदाचित दुसऱ्या देशात एखादे क्षेपणास्त्र असते, किंवा—किंवा त्या कल्पनेवर आधारित काहीतरी, आणि आपल्याला लष्करी रणनीतीमध्ये—मध्ये त्याचा प्रतिकार करण्यासाठी काहीतरी शोधावे लागेल.

23 बरं, हाच प्रकार मंडळीमध्येही घडतो, त्या परगण्यात जिथे एखादा मनुष्य प्रचार करत असतो, किंवा जर तो कार्यक्षेत्रात एक सुवार्तिक आहे. जेव्हा तो उठाव पाहतो, आणि काहीतरी जे नुकतेच सुरु होत आहे, जात आहे, त्याचा बाल्यावस्थेत किंवा जे काही आहे; तो मनुष्य, जर तो देवाचा सेवक असेल, तर त्याने ती गोष्ट लोकांच्या मनांपासून इतकी लांब ठेवली पाहिजे की ते त्यापासून दूरच राहतील. आणि आम्हाला तसे होऊ दे असे वाटत नाही, की आपण अशा ठिकाणी जाऊ.

24 आता, इथे यिर्मयाच्या काळात, त्याची भविष्यवाणी, यशया—यशयाच्या—च्या मृत्यूला जवळजवळ साठ वर्षे झाली होती. आणि ते जवळजवळ साठ वर्षे प्रमुख संदेष्टा शिवाय होते. तिथे हबक्कूक आणि काही लहान संदेष्टे होते, परंतु यशया हा शेवटचा प्रमुख संदेष्टा होता. आणि लोकांकडे, त्या काळात, त्यांना बोलावण्यासाठी कोणीही नव्हते. ते वाट चुकले होते. तरीही, ते परमेश्वराचे लोक होते, आता अशा अवस्थेत वाट चुकले गेले होते ज्या—ज्या अवस्थेत आपल्याला ते आढळतात, जसे यिर्मया त्यांना भविष्यवाणी देण्यासाठी आला. आणि यिर्मयाही...त्याने निर्वासनापूर्वी भविष्यवाणी केली, आणि तो त्यांच्याबरोबर निर्वासनातही गेला.

25 आणि मग, अर्थातच, दानीएल यिर्मयाच्या नंतर आला. आणि दानीएलाने म्हटले की त्याला, वचनानुसार, सत्तर वर्षे तिथे राहण्याची समज होती.

26 अर्थात, त्यांच्या मध्ये आणखी एक संदेष्टा होता, ज्याला हे जू ठेवायचे होते, जेव्हा त्याने ते आपल्या मानेवर ठेवले, की ती एक छोटीशी गोष्ट असेल, की दोन वर्षांच्या आत, परमेश्वर त्या सर्वांना परत आणणार होता, परंतु यिर्मयाला त्यापेक्षा वेगळे माहित होते. आणि आपल्याला माहित आहे की त्या संदेष्ट्याचे काय झाले ज्याने चुकीची भविष्यवाणी केली, तो त्याच वर्षी मरण पावला. तर देवाने त्याला उभे राहू दिले नाही.

27 आणि आता आपण त्या दिवसांतील लोकांची परिस्थिती पाहतो. आता तुम्ही माझा गैरसमज करुन घ्यावा असे मी इच्छित नाही, माझा—माझा हे उद्देश नाही...माझा सांगण्याचा उद्देश इथे हे आहे, काही शास्त्रवचने आणि लहान टिपा.

28 पूर्वी मला माझी शास्त्रलेखं आणि गोष्टी लिहून ठेवाव्या—या लागत नव्हत्या. पण जेव्हा मी पंचवीस वर्षे दुसऱ्यांदा ओलांडली, मी—मी पूर्वीसारखे लक्षात ठेवू शकत नाही, म्हणून मी एक शास्त्रलेख लिहीतो आणि त्याने माहीत असते की, मी कोठे जात आहे. आणि मग इतका वेळ आजारी लोकांसाठी प्रार्थना करणे, आणि इत्यादी, आणि बाहेर जाण्यात गेला, की माझ्याकडे अभ्यास करण्यासाठी वेळ नाही जसा मला करायला हवा होता.

29 आता, परंतु या दिवसाचा हा महान संदेष्टा, यिर्मया होता, आणि तो आमोस आणि इतर अनेक संदेष्ट्यांच्या प्रमाणे उठला होता. जेव्हा त्याने देशाची परिस्थिती पाहिली तेव्हा तो हलला होता. आता तिथे जागा होत्या...

30 कधी कधी जेव्हा तुम्ही एखाद्या राष्ट्राविषयी बोलता, त्यांना वाटू शकते की ते एखाद्या—एका विशिष्ट समुहाविषयी प्रतिबिंबित होत आहे. ते तसे नाही. ते संपूर्ण राष्ट्राचे चित्र आहे. आणि आपण पाहतो, आज, एक—एक अतिशय तुलनात्मक स्थिती आहे जशी ती यिर्मयाच्या दिवसात होती, की ते राष्ट्र स्वतः, एकंदरीत, काही प्रमाणात, मूर्तीपूजेत गेले

आहे; एकप्रकारे, मी म्हणेन, देवापासून दूर गेले. आणि तसे करण्याने, तो उपदेशमंचाचा कमजोरपणा आहे. कारण, जर उपदेशमंच सरळ राहिले असते, आणि देवाच्या वचनासह राहिले असते, परमेश्वर प्रत्येक मंडळीत असता जसा तो इथे आमच्यामध्ये कार्य करत आहे. परंतु त्यांनी त्यापासून दूर नेले आहे. आणि तीच गोष्ट आहे ज्याविषयी मला—मला आज सकाळी बोलायचे आहे. आणि आता आपण पाहतो की ते प्रत्येक युगात पूर्णपणे खरे ठरते.

31 मला वाटते तो आमोस होता, जसे मी थोड्या वेळापूर्वी त्याचा उल्लेख केला, की तो म्हणाला तो "संदेष्टा नाही, आणि संदेष्ट्याचा पुत्रही नाही." पण म्हटले, की, "जेव्हा सिंह गर्जतो, कोण भिणार नाही?"

32 आणि जर कोणी कधी जंगलात खऱ्या सिंहाची गर्जना ऐकली असेल, जे तुम्ही आजूबाजूला पिंजऱ्यात ऐकतात ते फक्त म्यांव करतात. परंतु जेव्हा एखादा जंगलात गर्जना करतो, तेव्हा सर्वजण सावध होतात. मी त्यांची शिकार करण्यासाठी, जंगलात राहिलो आहे. आणि तो प्राण्यांचा राजा आहे, आणि, जेव्हा तो सिंह गर्जतो, भुंगेही ओरडणे थांबवतात, सर्व काही थांबतं. ते—ते कोल्हे आणि—आणि तरस जे किंचाळत होते, आणि तसेच इतर प्राणी, आणि बबून आणि माकडे, भुंगे, असे होतात की स्वतःचे विचारही ऐकू येत नाहीत; परंतु दूरवर सिंह गर्जला की, आणि प्रत्येक भुंगेही गप्प होतात. पाहा, सर्वजण त्याला घाबरतात. तरी, तिथे पुष्कळ गोष्टी त्याला मारु शकतात, परंतु तो प्राण्यांचा राजा म्हणून ओळखला जातो.

33 तो म्हणाला, "जेव्हा सिंह गर्जतो, कोण भिणार नाही?" तो म्हणाला, "परमेश्वर बोलला आहे, तर कोण भविष्यवाणी न करील?"

34 आणि मला वाटते, तीच स्थिती आज पुन्हा त्या आव्हानाला सामोरी जाते. परमेश्वर बोलला आहे. पाहिले? आणि आपण भिंतीवर हस्तलेख पाहतो, म्हणून भविष्यवाणी करणे आणि आपण अंतिम काळात आहोत हे समजणे खूप सोपे आहे.

35 आणि आपण देवाला पाहत आहोत, संप्रदायाच्या प्रत्येक विभागांतून, अगदी कॅथलिक परंपरेपासून सुरू करून, सर्व प्रोटेस्टंट मंडळ्यांमधून, बुद्ध आणि आणखी भारतातून येणाऱ्या इतर परंपरांमधून, आणि जे काही अजून आहे, तो त्याच्या लोकांना एकत्र बोलावीत आहे, त्यांना एकत्र करत आहे. आणि मी—मी त्यासाठी खूप आनंदी आहे, की हा दिवस येत आहे. आता आपण...हा—हा एक महान दिवस आहे, सर्वात मोठ्या विशेषाधिकारांपैकी एक आहे.

36 जर, मला हे करावे लागले असते, जर मला हे जग निर्माण होण्यापूर्वी कळले असते, जेव्हा आपण प्राण देवाचा एक भाग होतो, जे आपण आहोत, कारण जगाच्या स्थापनेपूर्वी आपण त्याच्याबरोबर होतो. कारण, सार्वकालिक जीवनाचे एकच प्रकार आहे, आणि तो परमेश्वर आहे. आणि आपण त्याचे भाग आहोत. आपण असे नव्हतो की आपल्याला कळेल आणि—आणि विचार करू शकू, आणि अस्तित्व असेल; परंतु आपण जगाच्या स्थापनेपूर्वी, आपण काय आहोत ह्याविषयी त्याच्या विचारात होतो. कारण, आपण त्याचे भाग आहोत, जसा माझा पुत्र माझा भाग आहे, आणि मी माझ्या वडिलांचा भाग आहे, आणि इत्यादी. आपण परमेश्वराचे पुत्र आणि कन्या आहोत, त्याच्या पूर्वज्ञानाने.

37 आणि त्या वेळी, जर मला जसे आता माहित आहे तसे माहित असते, आणि मी संपूर्ण काळ पाहू शकलो असतो, आणि तो मला म्हणाला असता, "तुला कोणत्या काळात राहायचे आहे?" मी म्हणालो असतो आता याच काळात, जो—जो जगाच्या इतिहासाच्या

समाप्तीची पूर्वसंध्या आहे, आणि देवाचे राज्य पृथ्वीवर स्थापित होण्यासाठी येत आहे. मला वाटते हा सर्व युगांतील सर्वात गौरवशाली काळ आहे, जो आता आहे.

38 इथे आपण पाहतो की इस्राएलला संदेष्ट्याने दोषी ठरवले, जेव्हा परमेश्वराने त्याला नेमले होते आणि त्याला बाहेर पाठविले होते, त्यांच्यावर दोन मोठ्या पापांचा आरोप लावण्यात आला. आणि आम्हाला त्यांनी केलेल्या त्या दोन गोष्टींबद्दल बोलायचे आहे. आणि, त्यातून, आपल्याला त्याद्वारे पुढे बघायचे आहे. आता, ते देवापासून, जिवंत पाण्याच्या झऱ्यापासून वळले होते, आणि स्वतःसाठी हौद खोदली. जे देवाने त्यांना दिले होते त्यापासून त्यांनी पाठ फिरवली, आणि त्यांनी स्वतःला काहीतरी खोदले होते जे त्यांनी स्वतः केले होते. आणि ही हौद, तुम्ही पाहिले, जे त्याच्याकडे होते, ते तुटलेली होते आणि गळत होते.

39 आता, तुटलेली हौद पाणी धरू शकत नाही. ते गळून जाईल. मी एका शेतात लहानाचा मोठा झालो, आणि मला माहीत आहे की जुनी हौद काय आहे, आणि त्याने आम्हाला होणाऱ्या अडचणीही.

40 आणि ही गळणारे हौद एक—एक अतिशय चांगले चित्र आहे, मला वाटते, या दिवसाचे, जेव्हा (आपल्या) सर्व गोष्टी ज्या आपण करण्याचा प्रयत्न केला, माणसांना एकत्र करण्यासाठी, लोकांना एकत्र करण्यासाठी, मंडळींना एकत्र करण्यासाठी, हे सर्व प्रयत्न नेहमी बुद्धीच्या क्षेत्रातच राहिले आहेत. आपण प्रयत्न केला की सर्व मेथोडिस्ट बॅप्टिस्ट व्हावेत, आणि त्याउलट, तसेच विविध संप्रदायही. आणि सुरुवातीपासूनच, तो देवाचा कार्यक्रम नव्हता.

41 परमेश्वराचे फक्त एकच भेटीचे ठिकाण आहे. त्याने निर्गम पुस्तकात म्हटले आहे, की, "मी माझे नाव ठेवण्यासाठी एक स्थान निवडला आहे, आणि तेच एक स्थान आहे जिथे मी लोकांना भेटेन." आणि त्याने आपला नाव ठेवण्यासाठी एक स्थान निवडला होता. आणि जिथे त्याने आपला नाव ठेवला, तिथेच तो इस्राएलला भेटला. त्याचा एक स्थान आहे जिथे तो आज त्याच्या मंडळीला भेटतो, आणि त्याने ते नाव निवडले, आणि ते नाव येशू ख्रिस्त आहे. आणि तिथेच तो खऱ्या विश्वासीला भेटतो, जेव्हा तो येशू ख्रिस्तामध्ये असतो. तिथेच देवाने त्याचे नाव ठेवण्यासाठी निवडले.

तुम्ही म्हणता, "परमेश्वराचे नाव?"

42 तो म्हणाला, "मी माझ्या पित्याच्या नावाने आलो आहे." तर तिथेच देवाने त्याचे नाव ख्रिस्तामध्ये ठेवले. आणि ख्रिस्तामध्येच आपण सर्व सांडलेल्या रक्ताखाली भेटू शकतो, आणि तिथेच वास्तविक, खरी संगती आहे.

43 परमेश्वराने त्याची योजना सुरुवातीला एदेन बागेत केली, जिथे तो मनुष्याला भेटणार होता, आणि ते बुद्धीच्या समजुतीवर नव्हते; जर तसे असते, हव्वा त्याच्या योजनेप्रमाणे अगदी जुळत होती. परंतु आपल्याला ठाऊक आहे की तिने सैतानाची बौद्धिक विचारधारा स्विकारली, "निश्चितच, परमेश्वर तसे करणार नाही," परंतु परमेश्वराने म्हटले की तो करील! आणि मग त्याने मुक्तीचे स्थान निवडले, आणि ते रक्ताद्वारे होते, आणि बौद्धिक विचारधाराद्वारे नाही.

44 म्हणून आपण फक्त हवेत मारतो आहे, परंतु हा मानवी स्वभाव आहे की—की लोक असे करण्याचा प्रयत्न करतात. जर आपल्याकडे वेळ असता, आपण त्याला अनेक भागांत विभागून करु शकलो असतो, परंतु मला ते बटण नको आहे. म्हणून आपण ते शक्य तितके सोपे करण्याचा प्रयत्न करू, "गळणारे हौद." आणि आपण पाहतो की ते—ते पुन्हा अगदी

तसेच घडले आहे, हे आपल्या युगाचे चित्र आहे ज्यात आपण राहत आहोत, आपल्या सर्व प्रयत्नांचे.

45 आणि देवाचा जो कोणी सेवक आहे, जो येशू ख्रिस्ताचे नाव घेतो त्याच्या प्रत्येक प्रयत्नाचा अनादर करत नाही. त्याने केवळ आदराने आणि सन्मानपूर्वक त्याचे नाव घेतले तरी त्याला सन्मान मिळायला हवा. आणि महान सुवार्तिकांच्या प्रणाली ज्या पृथ्वीवर पसरलेली आहेत, आणि इत्यादि, या शेवटल्या दिवसांत, मला वाटते, आपण लोकांना एका अंतःकरणात आणू शकणार नाही, जोपर्यंत आपण त्यांना येशू ख्रिस्ताच्या रक्ताखाली आणत नाही. तेच एक स्थान आहे जिथे आपण नेहमी सुरक्षित राहू शकतो.

46 काही दिवसांपूर्वी, मला पूर्वेकडून कोणीतरी फोन केला, आणि म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, मी ऐकले आहे की तुम्ही ॲरिझोना ला—ला गेले आहात, आणि तुम्ही एक—एक अशी जागा बनवली जिथे सुरक्षितता आहे." आणि जसे तुम्हाला माहीत आहे की हा संदेश कसा आला, आणि प्रभूने मला सांगितले की अलास्कामध्ये काय घडणार आहे, आणि कॅलिफोर्नियामध्ये ते कसे असेल, आणि तसेच झाले आहे. ते म्हणाले, "आता जर ते हलत असेल, आणि सर्वकाही, तर सुरक्षित क्षेत्र कोठे आहे?"

47 मी म्हणालो, "एक सुरक्षित क्षेत्र आहे ज्याविषयी मला माहित आहे. ते ख्रिस्तामध्ये आहे. जे ख्रिस्तामध्ये आहेत, ते करतील..." हेच एक आहे जे मी जाणतो.

48 आता यिर्मयालाही, "रडणारा संदेष्टा" म्हटले होते. आणि कारण, मला वाटते, की या संदेष्ट्याला रडावे—रडावे लागले, खरं म्हणजे, कारण तो एक संदेष्टा असल्यामुळे (आणि देवाचे वचन अशांकडे येते) आणि लोकांना त्यांच्या रितीरिवाजानुसार चालताना पाहून, आणि त्यांना वाटले ते सर्व ठीक आहेत, आणि त्यांना वळविण्याचा कोणताही मार्ग नव्हता.

49 कारण, ते थेट बंदिवासात जाणार होते, कारण आम्हाला माहीत आहे की आपण जे पेरतो तेच कापतो, तुम्ही कोण आहात, तुम्ही काय आहात यांची पर्वा न करता. आणि एक राष्ट्र म्हणून आपण कापणी केली, किंवा, खरं तर, पेरली, आणि आपल्याला कापणी करावी लागेल. मी उद्या, जर प्रभूची इच्छा असेल, दुपारी, *जन्म वेदना* या विषयावर बोलणार आहे; आणि मी—आणि मी त्या गोष्टी घेतल्या, की आपण काहीही करून सुटू शकत नाही. आपण जे पेरतो तेच कापावे लागते.

50 आणि जर परमेश्वर आपल्याला आज ख्रिस्तीत्वाच्या विकृतीपासून मुक्त होऊ देईल तर, आणि लोकांना ज्या तथाकथित ख्रिस्ती धर्मात भ्रष्ट करून चालू दिले, जसे भाऊ मूरने एकदा म्हटले, "त्याला नैतिकदृष्ट्या सोडोम आणि गमोरा पुन्हा उभे करावे लागतील, आणि त्यांना जाळल्याबद्दल माफी मागावी लागेल." ते बरोबर आहे, कारण परमेश्वर अजूनही न्यायी आहे. आणि जिथे अन्याय होतो; हे—हे त्याच्या पवित्रतेला आणि त्याच्या वचनाला शोभणारे आहे की तो लोकांना त्यांनी जे पेरले आहे तेच कापण्यास लावतो, आणि आपल्याला ते करावे लागेल.

51 आता लक्ष द्या, त्यांनी त्याला, जिवंत पाण्याच्या झऱ्याला, सोडले आणि स्वतःसाठी हौद खोदले.

52 आता इथे कोणीतरी असेल ज्याला हौद म्हणजे काय हे समजत नसेल. हौद मनुष्याने बनवलेली टाकी आहे जे विहीरीची जागा घेण्याचा प्रयत्न करते. ती कुणीतरी खोदलेली असते. आणि किती जणांना हे माहित आहे की हौद म्हणजे काय? छान. ठीक आहे, आज सकाळी इथे बरेच ग्रामीण लोक आहेत. तर ते...मला त्या जागेचा जुना हौद आठवतो, तो कसा दिसायचा, आणि मला त्यातून प्यायला नेहमी भीती वाटायची. ते एक—एक

मनुष्याने बनविलेले हौद होते. आणि त्यावर कधीच विश्वास ठेऊ शकत नाही. तुम्ही हौदावर अवलंबून राहू शकत नाही.

53 आता मनुष्य जे काही करतो ते सहसा फार चांगले नसते. परंतु जसे—जसे परमेश्वराने वेळेला त्याच्या चक्रामध्ये—मध्ये—मध्ये बसवला, आणि पृथ्वी तशी फिरत राहते; प्रत्येक वर्षी, प्रत्येक वेळी ते ओलांडते, प्रत्येक दिवस, प्रत्येक तास, आणि सूर्य मावळतो, आणि ते कधीच चुकत नाही. परंतु आपल्याला मिळू शकणारी उत्तम घड्याळे, एका महिन्याभरात अनेक मिनिटांनी चुकतात, यात शंका नाही. परंतु, तुम्ही पाहा, परमेश्वर जे काही करतो ते परिपूर्ण असते, आणि मनुष्य जे काही करतो ते अपरिपूर्ण असते. तर मग मनुष्य जे करतो ते का स्वीकारा, जेव्हा तुम्हाला परिपूर्ण मिळू शकते?

54 मी नेहमीच हे आमच्या पेंटेकॉस्टल लोकांविषयी बोललो आहे. पाहा, आपण जाणतो, आणि आपण—आपण अर्थातच, देवाच्या क्रमाबाहेर नाही, आपला असा विश्वास नाही; परंतु आपल्याला हेही ठाऊक आहे की आपल्यामध्ये असे लोक आहेत जे दुसऱ्या व्यक्तीची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. ते फक्त मानवी आहे. ते तसे करण्याचा प्रयत्न करतील. त्यांनी ते बायबलमध्ये केले, "एक, मी पौलाचा आहे, 'मी सीलाचा आहे,'" आणि इत्यादी. परंतु ते—ते दुसऱ्याने काय केले किंवा करीत आहे त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात.

55 परंतु तुम्ही खोटी नक्कल का स्वीकाराल, जेव्हा आकाश खऱ्या गोष्टींनी भरलेले आहे, जेव्हा "हे अभिवचन तुम्हाला आणि तुमच्या लेकरांकरिता आहे"? आपण काहीतरी वेगळे का स्वीकारू? मग आपण एखादा मतप्रणाली किंवा सिद्धांत का स्वीकारावा, जेव्हा बायबल हे परमेश्वराचे शुद्ध वचन आहे? आपण का जोडण्याचा किंवा काढण्याचा प्रयत्न करू, जेव्हा प्रभू येशूने प्रकटीकरण 22:18 मध्ये म्हटले, "जो कोणी त्यांतून एक शब्द काढील, किंवा त्यात एक शब्द जोडेन, त्याचा भाग जीवनाच्या पुस्तकातून काढला जाईल"?

56 जेव्हा देवाने प्रथम मानव जातीला पृथ्वीवर ठेवले, त्याने त्यांना सांगितले की ते त्याच्या वचनाद्वारे जगतील. आता देवाचे वचन हे एका साखळीप्रमाणे आहे, तुम्ही त्याच्या आधाराने नरक पार होत आहात; आणि त्याची साखळी तिच्या सर्वात कमकुवत कडीमध्येच सर्वोत्तम असते, आणि देवाची इच्छा आहे की आपण त्याचे प्रत्येक वचन पाळावे. आता ते बायबलमधील पहिले होते; केवळ एक शब्द तोडल्यामुळे, मानवी जातीला मृत्यूच्या अंधारात ढकलले गेले.

57 येशू बायबलच्या मध्यभागी आला, आणि त्याने म्हटले की, "मनुष्य केवळ भाकरीने जगणार असे नाही, परंतु प्रत्येक वचनाने जगेल." केवळ वचनांचा काही भाग नाही, किंवा शंभर पैकी नव्याण्णव नाही; तर प्रत्येक वचन, जसे हव्वा आणि आदाम होते.

58 आणि बायबलच्या शेवटी, प्रकटीकरण २२:१८ मध्ये, त्याने म्हटले की, "जो कोणी यातून एकही शब्द काढून टाकेल किंवा त्यात एकही शब्द भरतील!"

59 तर मग आपल्याला इथे एखाद्याच्या कल्पना टाकायची गरज काय आहे, जेव्हा हे त्याविषयी देवाची स्वतःचे विचार आहे? त्याने जे सांगितले ते आपल्याला घ्यायचे आहे. आणि असेही लिहिले आहे, "प्रत्येक मनुष्याचे वचन खोटे ठरो, आणि माझेच सत्य ठरो."

60 हेच या संदेष्ट्याच्या बाबतीत होते. यिर्मयाच्या दिवसात, तो एक संदेष्टा होता, त्याच्याकडे परमेश्वराचे वचन होते. आणि हा व्यक्ती त्यात काहीतरी मिसळण्याचा प्रयत्न करत होता. आता, त्यावर अवलंबून राहता येणार नाही. आणि मी आता ह्या टाक्यांची

तुलना त्या प्रणालींशी करत आहे ज्या आपण स्वीकारण्याचा प्रयत्न केला आहे, आणि परमेश्वराच्या मूळ वचनाची जागा घ्यायचा प्रयत्न केला आहे.

61 कारण, कोणीही त्याची जागा घेऊ शकत नाही. तो परमेश्वर आहे. "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द परमेश्वराबरोबर होता, आणि शब्द परमेश्वर होता. आणि शब्द देहधारी झाला आणि आपल्यामध्ये वस्ती केली." आणि इब्री लोकांस पत्र 13:8 म्हणते, "तो काल, आज आणि युगानुयुगे सारखाच आहे." आपण त्यापासून कसे दूर जाऊ शकतो? ते सत्यच असले पाहिजे. तो सारखाच राहतो. तो प्रत्येक तत्वात सारखाच आहे.

62 म्हणूनच तुम्हाला त्याचा आनंद वाटतो, तुम्ही बॅप्टिस्ट आणि मेथोडिस्ट लोकांनो, आणि कॅथलिक, प्रेस्बिटेरियन, आणि इतर सर्वजण, त्या उपस्थितीचा आनंद घेतात. तुमच्यात, कुठेतरी, तुम्ही परमेश्वराला स्वीकारले आहे. कदाचित कधीतरी बौद्धिक प्रकारे, कदाचित तुम्ही परमेश्वराची सामर्थ्य अनुभवली असेल, आणि तुम्ही परमेश्वराचे सेवक आहात; परंतु जेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने देवामध्ये येऊ शकता, आणि देवाचा पुत्र किंवा कन्या म्हणून, त्याच्यामध्ये तुमचे स्थान ओळखू शकता, हेच तुम्हाला महान आनंद देते, जो देवाने तुम्हाला देण्यासाठी ठरवला आहे.

63 आता आपण संत मार्क 16व्या अध्यायात पाहतो, येशूने असे म्हटले नाही, "संपूर्ण जगात जा आणि—आणि—आणि शिकवा." तो म्हणाला, "जा, सुवार्तेचा प्रचार करा." सुवार्तेचा प्रचार करणे, म्हणजे, पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्रकट करणे! "संपूर्ण जगात जा, आणि पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्रदर्शित करा."

64 एका भावाबरोबर बोलत असताना, जो प्रायोजकांपैकी एक...भारतातील, माझ्या बॉम्बे येथील सभेचा होता, दक्षिण आफ्रिका आणि वेगवेगळ्या ठिकाणी, जिथे मिशनऱ्यांनी ते केवळ शब्द किंवा बौद्धिक संकल्पना म्हणून शिकवले होते. परंतु एके दिवशी सभेत, जेव्हा पवित्र आत्मा खाली उतरला, तो स्वतः, आणि एकाच वेदीच्या आवाहनात तीस हजार स्थानिक लोकांना तारण मिळाले, आणि अगदी त्याच भूमीवर जिथे ते उभे होते. तिथे उभ्या असलेल्या स्त्रिया जवळजवळ त्या नग्न अवस्थेत होत्या, ज्या अवस्थेत त्या जगात आल्या होत्या. आणि त्याच क्षणी जेव्हा त्यांनी ख्रिस्ताचा स्विकार करण्यासाठी आपले हात वर केले...

65 आणि पवित्र आत्मा त्या जागेवर उतरला आणि पंचवीस हजार लोकांना एकावेळी बरे केले, व्हीलचेअर, खाटे आणि स्ट्रेचरपासून उठले. दुसऱ्या दिवशी, शहराच्या महापौरांनी मला बोलावले, रस्त्यावरून जात असलेल्या त्या व्हॅनकडे पाहण्यास सांगितले.

66 त्या स्त्रिया तिथे उभ्या होत्या, नग्न, त्यांना माहीत नव्हते की ते नग्न आहेत. पण पवित्र आत्म्याने जसा त्यांना स्पर्श केला, त्यांनी आपल्या हाताने बांधून स्वत:ला झाकले व आपल्या पुरुषांच्या उपस्थितीतून दूर चालू लागले.

67 आणि मला आश्चर्य वाटते की आपण अमेरिकेत स्वतःला ख्रिस्ती राष्ट्र कसे म्हणतो, आणि देवाच्या उपस्थितीत; आणि प्रत्येक वर्षी आम्ही, आमच्या स्त्रिया, अजून कपडे काढतात. आणि तुम्ही तर अधिक परिधान केले पाहीजे. आणि जितके तुम्ही ख्रिस्ताला परिधान करता, तितके तुम्हाला स्वतःच्या अवस्थेची जाणीव अधिक होईल. कधी कधी मी पाहतो की लोक रस्त्यावर कसे वागतात, मला आश्चर्य वाटते की त्यांची मानसिक स्थिती खरोखर बरोबर आहे का. असे वाटते की त्यांना जाणवतच नाही, जेव्हा ते तसे करतात, ते जे करत आहे, त्याने ते स्वतःला सैतानासाठी चारा बनवतात, आणि प्राणांना नरकात पाठवतात. ते बरोबर आहे. परंतु जग अशाप्रकारे भ्रष्ट झाले आहे जसे यिर्मयाच्या दिवसात होते.

68 आता परत त्या हौदाकडे वळूया. आता, या हौदावर अवलंबून राहू शकत नाही कारण तो स्वतःला भरू शकत नाही. आणि त्याला भरण्यासाठी स्थानिक पावसावर अवलंबून राहावे लागते, स्थानिक पाऊस किंवा स्थानिक जागृती, थोडी जागृती *इथे*, थोडी जागृती *तिथे*, किंवा अशा प्रकारे, त्याला भरून काढण्यासाठी. म्हणून त्यावर अवलंबून राहू शकत नाही. ते स्वतः भरू शकत नाही. त्याची स्वतःची अपूर्णता आहे. तो ते करु शकत नाही. आणि त्याला भरण्यासाठी, पावसावर अवलंबून राहावे लागते.

69 मग आपण पाहूया, हा—हा हौद पाऊस कुठून घेतो, हा पाणी कुठून घेतो. ते कोठारांच्या, गोठ्यांच्या छपरावरून खाली येत, जिथे वाऱ्याने उडालेली धूळ साचलेली असते." ते पावसात मिसळून वाहते, आणि थेट खाली त्या हौदामध्ये, मनुष्याने बनवलेली एका टाकीत पडते. ते जवळजवळ एक घाण पाणी साचणारे ठिकाण बनते. आणि ते धान्याच्या कोठाराच्या छपरावरून वाहून जातं जिथे सगळे जनावरं असतात, आणि गोठ्याभोवतीच्या वासासह, आणि अशाप्रकारे पुढे, आणि मग स्थिर होतं. आणि त्या—त्या कोठारातील धूळ आणि इतर वस्तू वारा वाहून आत येतात, मग स्थानिक पाऊस येतो, आणि पाऊस सरळ, वाहून नेतो.

70 आणि मग ते पाणी मनुष्याने बनवलेल्या खाचेतून मनुष्याने बनवलेल्या नळ्याद्वारे, मनुष्याने बनवलेल्या टाकीत नेले जाते. आणि जेव्हा ते तिथे पोहोचतो, ते अस्वच्छ असते, इतका अस्वच्छ असते की तुम्हाला त्यावर कपड्याचा गाळण ठेवावा लागतो, नाहीतर तुम्ही ते पिऊ शकत नाही. आता, पाहा, ते छपरावरून वाहून, मनुष्याने बनवलेल्या खाचेतून, मनुष्याने बनवलेल्या नळीतून, मनुष्याने बनविलेल्या टाकीत पोहोचत आहे. आणि नंतर मनुष्याने बनवलेल्या गाळण त्याच्या वरती ठेवतात, की ज्यामुळे काही किडे वगैरे मागे राहतात.

71 आता, आता आपण पाहतो, काही दिवसात, तिथे पाणी साचल्यानंतर, त्या मनुष्याने बनवलेल्या संप्रदायमध्ये..., किंवा, टाकीमध्ये. क्षमा करा. क्षमा करा. ठीक आहे. सर्व प्रकारचे धर्मशास्त्र आणि गोष्टी त्यामध्ये धुऊन झाल्यावर, ते धुतल्या गेल्यानंतर—त्यानंतर, आता आपण पाहतो, जेव्हा तिथे काही दिवस थांबून जाते, तेव्हा ते जमून जाते.

72 आणि प्रत्येकाला ठाऊक आहे, मंडळीच्या इतिहासात, जेव्हा देव काहीतरी पुढे पाठवितो, एक संदेश, आणि तो देवाकडून ताजे येतो, मग त्या—त्या संस्थापकाच्या जीवनानंतर (किंवा ते काहीही असो, तुम्ही त्याला सुधारक म्हणा, किंवा तुम्हाला त्याविषयी जे काही सांगायचे आहे) त्याच्या मृत्यूनंतर, मग ते एक व्यवस्था तयार करतात आणि ते एक संघटना बनवतात. आणि जशीच ते त्यातून एक संस्था तयार करतात, ती तिथेच मरून जाते. ती पुन्हा कधीच उभी राहत नाही. प्रत्येक वेळी तसेच केले गेले, मागे, अगदी मागेपर्यंत.

73 इथे बसलेल्या कॅथॉलिक धर्मगुरुला आदर व्यक्त करताना; जेव्हा देवाने मंडळीला संघटित केले...किंवा, ते संघटित केले नाही, देवाने कधीच मंडळीला संघटित केले नाही. तो अशा प्रकारच्या व्यवसायात नाही. तो जन्मात आहे, संस्थेत नाही. तर, जेव्हा देवाने पेन्टेकॉस्टच्या दिवशी मंडळीची सुरुवात केली. आणि मग शेवटी नायसिया, रोम इथे, त्यांनी त्याचे संघटन केले, आणि तिथेच त्याने आपली सामर्थ्य गमावली.

74 मग आपण लुथरन सुधारणाकडे आलो, आणि ती एक महान गोष्ट होती. परमेश्वराचे वचन दिले होते, "नीतीमान विश्वासाने जगेल." आणि जेव्हा त्यांनी तसे केले, तेव्हा

एकत्र उचलून, सर्व एकत्र मिळून पुढे चालण्याऐवजी, त्यांनी लुथरन चर्च बनवले, त्यांनी स्वतःला या समुहापासून वेगळे केले, आणि मग ते संपले.

75 मग परमेश्वराने जॉन वेस्लीला पवित्रीकरणासह उभे केले, कृपेच्या दुसऱ्या कार्याचा संदेश घेऊन, आणि ते एक अद्भुत कार्य होते. परंतु वेस्ली आणि एस्बरी नंतर, त्यांनी त्याचे संघटन केले, मग ते निस्तेज झाले.

76 मग पेंटेकॉस्टल दानांच्या पुनर्स्थापनेसह वर आले. ते ठीक चालत होते, मग काय झाले? त्यांनी त्याचे संघटन केले आणि जीवन हरपले. अगदी तंतोतंत.

77 आता या सर्वांमध्ये, परमेश्वर अजूनही त्या प्रत्येक पिढ्यांतील शेष लोकांना बोलावीत आहे. तो नक्कीच करत आहे. आणि ही आपली बाहेर येण्याची, एकत्र येण्याची वेळ आहे. आणि तेच मला वाटते, फुल गॉस्पल बिझनेस मेन यांनी या भिंती तोडण्यात मोठी भूमिका केली आहे, आणि असे सांगत, “आमच्यामध्ये काही फरक नाही. चला आपण एकत्र येऊ आणि एका तत्त्वाखाली देवाची उपासना करूया, संस्थेखाली नाही.” जर ती एक संस्था असती, तर मी आता या मंचावरुन बाहेर पडलो असतो. मला त्याच्याशी काही देणे घेणे नाही.

78 ते काय आहे, ती एक संगती असली पाहिजे, आणि कोणत्यातरी मतप्रणालीची संगती नाही, परंतु ख्रिस्तामध्ये संगती, त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याद्वारे. हेच जीवन आणते, हेच जन्म आणते.

79 आणि जन्म होण्यापूर्वी, आपण जाणतो की जन्मापूर्वी मृत्यू असला पाहिजे. आणि जन्म म्हणजे गोंधळ असतो, मला पर्वा नाही की हा कोणत्या प्रकारचा जन्म आहे. जर ते डुकराच्या गोठ्यात ही आहे, किंवा—किंवा ते कोठेही आहे, तो गोंधळच असतो. आणि तसाच नविन जन्म, तो तुम्हाला अशा गोष्टी करायला लावतो ज्या सामान्यतः तुम्हाला वाटत नाही की तुम्ही कराल. परंतु जेव्हा तुम्ही स्वतःसाठी मरण्यास तयार आहात, तेव्हा तुम्ही नव्याने जन्म घेतले आहे, ख्रिस्त येशूमध्ये नविन सृष्टी, मग गोष्टी, उघड होतात आणि जीवन तुमच्यासाठी एक नविन दृष्टी बनते, कारण तुम्ही येशू ख्रिस्ताच्या व्यक्तीला स्वीकारले आहे, एखाद्या सिद्धांताला किंवा मतप्रणालीला नाही.

80 किंवा, लिखित वचनालाही, ते पवित्र आत्म्याद्वारे जिवंत केले पाहिजे. तुमच्याकडे कितीही धर्मशास्त्र ज्ञान असले, तरी ते मृत पडलेलेच आहे. माझ्याकडे मूठभर गहू असू शकतो; पण तो जिवंत होण्यासाठी योग्य प्रक्रियेत गेला नाही तर, तो कधीही जिवंत होणार नाही. आणि तुम्ही डॉक्टरची पदवी, पीएच., एलएल., तुम्हाला हवी ती, घेऊ शकता; परंतु जोपर्यंत पवित्र आत्मा त्यावर येऊन तो तुम्हाला जिवंत करत नाही, देवाबरोबरचा वैयक्तिक अनुभव म्हणून, मग गहू काहीच उपयोगी ठरणार नाही. तुमचे शिक्षण व्यर्थ आहे.

81 जसे त्या इंग्रजाने त्या रात्री इथे म्हटले, मी त्यावर फार आश्चर्यचकित झालो. त्याच्याकडे असलेले सर्व ज्ञान, पौलाप्रमाणे, त्याला ख्रिस्ताला शोधण्यासाठी, त्याला सर्व माहीती विसरावे लागेल, तो ज्या गोष्टी करणार नाही असे त्याला वाटले होते, त्या गोष्टी त्याने केल्या.

82 परंतु परमेश्वर तशाच प्रकारे करतो, तो आपल्या शिक्षण प्रणालीमध्ये आपला अपमान करतो. मी अज्ञानाचे समर्थन करण्याचा प्रयत्न करीत नाही, परंतु मी तुम्हाला फरक सांगण्याचा प्रयत्न करत आहे. शिक्षण कधीच जीवन आणू शकत नाही. जीवन आणण्यासाठी परमेश्वराचा आत्मा लागतो, आणि ते जीवन केवळ बौद्धिक जागृतीतून येऊ नये. ते बायबलमधून आले पाहिजे, वचन जागृती, आणि ते वचन काल, आज आणि युगानुयुग सारखेच आहे. आणि जेव्हा ते आज उतरते, आणि जिवंत करते, तेव्हा तुम्हाला

प्रेषितांचीं कृत्ये २ मध्ये जे परिणाम झाले होते, तेच परिणाम मिळतात. अगदी तसेच. ते नेहमी तसेच झाले आहे, आणि तसेच होत राहील, कारण परमेश्वराचा आत्माच वातावरण तयार करतो.

83 काही गोष्टी घडण्यासाठी वातावरण लागते. म्हणूनच तुम्हा लोकांना नेहमी शिकवले जाते, "तुमच्या लेकरांना इथे आणा." नक्कीच ते बरोबर आहे. मला आनंद झाला की माझी मुलगी, रेबेक्का, काही मिनिटांपूर्वी, आत आली आणि बसली. तुमच्यातील काहींनी मला एका स्त्रीकडे डोळे मिचकावताना पाहिले, ती माझी मुलगी होती, तर ती आत आली आणि खाली बसली. तिला आत्म्याचा बाप्तिस्मा मिळावा अशी माझी इच्छा आहे, आणि म्हणूनच ती इथे सभेत आहे. हाच त्याचा उद्देश आहे. त्यासाठी वातावरण लागते.

84 जसे जुने डॉक्टर बॉसवर्थ म्हणत असत, "तुम्ही कोंबडीची अंडी घेऊ शकता आणि ती पिल्लाखाली ठेवू शकता, त्यातून कोंबडीचे पिल्लू येईल." का? कारण तो अंडा आहे आणि त्याला योग्य वातावरण मिळाले आहे.

85 मला फरक पडत नाही की तुम्ही मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेस्बिटेरियन आहात; योग्य वातावरणात, ते देवाचा नवा जन्मलेला मुलगा घेऊन येईल. वातावरणच ते घडवते, तुम्ही कोणत्याही संप्रदायाचे असलात तरी फरक पडत नाही.

86 पूर्वी गुरे राखायचो. जेव्हा आम्ही त्यांना जंगलात घेऊन जायचो, तेव्हा तो वनरक्षक माझ्या नजरेस पडला, चरण्याच्या जागेतून—त्या मधून खालील कुरणात, आणि त्यांना जंगलात सोडायचो. तो तिथे उभा राहून पाहत राहायचा, जेव्हा ती गुरे फाटकातून, वाहत्या कुंपणाजवळ जात असत. त्याने कधीच नामांकित गोष्टीकडे इतके लक्ष दिले नाही, कारण तिथे सर्व प्रकारचे नामांकित गोष्टी जात होते. पण एक गोष्ट मात्र त्याने लक्षात घेतली, रक्ताचे चिन्ह. ते शुद्धवंशीय हेरफर्ड असणे आवश्यक होते अन्यथा ते त्या जंगलात जाऊ शकत नव्हते, कारण हेअरफोर्ड असोसिएशन ही त्या जंगलात चारते. प्रजनन योग्य ठेवण्यासाठी, त्यावर रक्ताची खूण असणे आवश्यक आहे.

87 आणि मला वाटते की न्यायाच्या दिवशी असेच होईल. तो मला हे विचारणार नाही की मी मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, पेंटेकॉस्टल, किंवा प्रेस्बिटेरियन होतो का, परंतु तो रक्ताच्या चिन्ह आहे का ते पाहणार आहे. "जेव्हा मी रक्त पाहीन, तेव्हा मी तुमच्यापुढे जाईन." हीच गोष्ट आहे.

88 म्हणून आपण पाहतो की हे हौद, काही वेळ तसेच पडून राहिल्यावर, ते साचलेली होते आणि उपयोगाची राहत नाहीत. आणि मग ते बेडूक आणि सरडे आणि साप आणि किडे आणि जंतू यांचे घर बनते, आणि अजून कितीतरी गोष्टींचे, कारण ही एक साचलेली स्थिती आहे जी त्यात ढकलली गेली आहे. तुम्ही कल्पना करु शकता, की धान्याचे कोठार छपरावरून, किंवा धान्याच्या कोठाराजवळील घर, किंवा जिथे माती असेल तिथून पाणी वाहून येते, कोणत्या प्रकारचे कीटक आणि जंतू, आणि सर्व गोष्टी, जे या हौदात वाहून येतात?

89 आता, हे कोणत्याही प्रकारच्या मानवनिर्मित प्रणालीचे परिपूर्ण उदाहरण आहे. तो सुरुवातीपासूनच, अपयशी आहे. म्हणून त्याला तारणहाराची गरज आहे. तो स्वतःला वाचवू शकला नाही, त्यासाठी तो काहीच करू शकत नाही. तो सुरुवातीपासूनच, हरवलेला आहे. तो पापी होऊन, जगात जन्मला आहे, तो जगात येऊन खोटे बोलतो. तो खोटा आहे, सुरुवातीपासूनच, मग जगात तो स्वतःसाठी काही कसे करु शकतो? पवित्र मनुष्य कसा करु शकतो?

90 कोणताही मनुष्य पवित्र नाही. कोणतीही मंडळी पवित्र नाही. हे एक पवित्र आत्मा आहे! पवित्र मंडळी नाही, पवित्र लोक नाही; तो पवित्र आत्मा आहे लोकांमध्ये वास करणारा, तोच तो आहे. आमेन. तो पवित्र डोंगर ही नाही जिथे पेत्र आणि ते उभे होते; तो डोंगर पवित्र नव्हता. परंतु तो पवित्र परमेश्वर आहे, जो डोंगरावर होता, त्याने ते पवित्र केले. पवित्र व्यक्ती नाही; तो पवित्र आत्मा आहे जो त्या व्यक्तीमध्ये कार्य केला जातो, ज्यामुळे तो पवित्र होतो. व्यक्ती नाही; परंतु पवित्र आत्म्याचा व्यक्ति! तो मनुष्य नाही; कारण, तो फक्त एक मनुष्य आहे, "पापात जन्मलेला, अधर्मात आकार घेतलेला, खोटं बोलत जगात आला."

91 मनुष्याने बनवलेली कोणतीही प्रणाली त्याला त्याच अवस्थेतच ठेवते. तो त्या बुध्दीमान व्यक्तींपासून त्या गोष्टीला आंधळा करील, ते बुद्धीमान डोळे, ज्याविषयी ते विचार करतात, "मी मंडळीचा आहे, माझे नाव पुस्तकात आहे. मी *हे* केले आहे. माझे वडील *हे* होते आणि अशाप्रकारे." ते सर्व ठीक वाटते; जे, ते आहे, त्याविरुध्द बोलण्यासारखे काहीच नाही. परंतु तरीही, मित्रा, येशूने म्हटले, "मनुष्याचा नविन जन्म झाल्याशिवाय, तो पाहू पण शकत नाही," *पाहणे*, तिथे, याचा अर्थ असा नाही की तो त्याच्या डोळ्यांनी पाहत आहे, परंतु, "स्वर्गाचे राज्य *समजतो*." जोपर्यंत तुम्ही त्यात जन्म घेत नाही!

92 हा बॅप्टिस्ट सुवार्तिक कसा असेल, तो मनुष्य जो तिथे उभा राहून टीका करत होता आणि त्याची चेष्टा करत होता? पाहा, त्याच्यात काहीही नाही जे त्याला स्विकारू शकत होते; परंतु परमेश्वराला ते करावे लागले होते, पाहा. परमेश्वराने त्याला पवित्र आत्मा दिला. त्याने प्रकट केले की हे ढोंग नव्हता, हे वचन आहे. तो फक्त शाळेच्या कल्पनेतूनच हे ऐकतो, आणि परमेश्वराचे जे—जे आशीष आहे ते घेऊन गेलेल्या दिवसात ठेवण्याचा प्रयत्न करतात.

93 एक तरुण बॅप्टिस्ट प्रचारक, काही दिवसांपूर्वी, आज सकाळी इथेच उपस्थित बसला आहे; आणि तो माझ्याकडे आला, आणि तो म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, तिथे एक गोष्ट आहे जी तुम्ही करत आहे ती चुकीची आहे."

मी म्हणालो, "मला मदत कर."

94 आणि तो म्हणाला, "तुम्ही, मला वाटते तुम्ही प्रामाणिक आणि चांगले व्यक्ती आहात, परंतु..."

मी म्हणालो, "धन्यवाद, महाशय."

तो म्हणाला, "परंतु एक गोष्ट आहे जी तुम्ही चुकीची करत आहे."

मी म्हणालो, "मला आशा आहे की प्रभूला फक्त एकच चूक सापडो."

95 आणि तो म्हणाला, "बरं, हे आहे...तुम्ही हे चुकीचे करत आहे." म्हणाला, "तुम्ही जगाला प्रेषिताच्या सेवकाईला परिचय करायचा प्रयत्न करत आहात, आणि," म्हणाला, "प्रेषितांची सेवकाई प्रेषितांबरोबर समाप्त झाली."

96 मी म्हटलो, "बॅप्टिस्ट म्हणून बॅप्टिस्टशी बोलताना, मला तुला एक प्रश्न विचारायचा आहे."

म्हणाला, "काय?"

97 मी म्हटलो, "तुझा विश्वास आहे का की देवाचे वचन प्रेरित आहे, त्यातील प्रत्येक भाग?"

तो म्हणाला, “नक्कीच, का.”

98 मी म्हटलो, “मग, त्याने सांगितले, एकही शब्द जोडू नको, किंवा एकही काढू नको. कारण,” तेव्हा मी म्हणालो, “मी तुम्हाला दाखवीन की प्रेषितीय आशीर्वाद देवाच्या अभिवचनाद्वारे, लोकांवर कोठे आला, आता तुम्ही मला देवाचे अभिवचन दाखवा की कधी ते लोकांपासून दूर गेले. पाहा, जर तुम्ही ते वचनात आणू शकत नाही, तर—मग त्याविषयी विसरुन जा, पाहा,” मी म्हणालो, “कारण ते अजूनही चालत आहे.”

99 तो काही मिनिटांसाठी काहीच बोलला नाही. आणि मग मी म्हणालो, “ठीक आहे, तर मग, भाऊ, मला तुम्हाला हे विचारायचे आहे. पेत्राने पेंटेकॉस्टच्या दिवशी, प्रेषितीय संदेशाचा परिचय दिला. आणि आपणा सर्वांना माहीत आहे की ते खरे आहे, कारण त्याच्याकडे राज्याच्या चाव्या होत्या, ज्या येशूने त्याला दिल्या होत्या. आणि आता पाहा तो काय म्हणाला. तो म्हणाला, ‘तुमच्यातील प्रत्येकाने पश्चाताप करा, आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, आणि तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान मिळेल. कारण हे अभिवचन तुमच्यासाठी, आणि तुमच्या मुलांसाठी आहे, आणि जे दूर आहेत त्यांना, जितक्यांना प्रभू आपला देव बोलावील दिले आहे.’ मग जर तिथे एखादी जागा आहे जिथून त्याने ते काढले, तर पेंटेकॉस्टच्या दिवशी पेत्राच्या शब्दांचे काय झाले?” समजले? नाही, ते कधीच थांबलेले नाही!

प्रिय बलिदानी कोकरा, तुझे मौल्यवान रक्त
कधीच आपली शक्ती गमावणार नाही,
देवाच्या सर्व मुक्तीप्राप्त मंडळीला
तारण मिळावा, की यापुढे पाप होऊ नये.

मग एका थोर, मधुर गाण्यात,
मी तुझ्या तारणाच्या सामर्थ्याविषयी गाईन,
जेव्हा ही बिचारी थरथरणारी, अडखळणारी जीभ
कबरेत शांत पडेल.

100 परमेश्वर मला त्यावर विश्वास ठेवण्यास आणि त्याला पकडून ठेवण्यास, आणि आपणा सर्वांना त्याच्या पाठीशी उभे राहण्यास मदत करो, कारण ते सुसमाचार सत्य आहे! होय, महाशय.

101 शहाणा मनुष्याने या गोष्टींकडे कधीच पाहू नये. आणि हे जाणावे की त्या कार्य करणार नाहीत. त्यांनी कधीच कार्य केले नाही. एक संघटित धर्म आणि संघटित अनुभव देवाच्या उपस्थितीत कधीही कार्य करणार नाही. ते शुद्ध स्वरूपात, देवाकडूनच, आले पाहिजे. ते परमेश्वराने कधीच वापरली नाही, पूर्वी कधीच परमेश्वराने अशी प्रणाली वापरली नसेल. आता तुम्ही, ओह, तुम्हाला सदस्य आणि अशा गोष्टी मिळतात. परंतु मला असे म्हणायचे आहे की परमेश्वराचे खरे बीज, जसे पेंटेकोस्टच्या दिवशी आशीर्वाद उतरला, ते कधीच संघटनेद्वारे येत नाही; तो जन्माने येतो, नविन जन्म घेऊन.

102 आपल्याला इस्राएलचे—चे उदाहरण घेण्यासाठी सांगितले आहे, जे ते होते. लक्ष द्या, “त्यांना प्रदान केलेला झरा, त्यांनी सोडले, आणि त्यांनी स्वतःसाठी हौद खोदले आहेत.” काय तुम्ही कल्पना करु शकता की एक—एक—एक—एक गोष्ट, जेव्हा एक मनुष्य विहिरीजवळ आहे, पिताना, आणि पाहा, त्यांना पाणी पिण्यासाठी हौद बनवायचे आहे? आता तेच संदेष्टा म्हणाला, तेच देवाचे वचन सांगते. हेच देवाने संदेष्ट्याला सांगितले. “तुम्ही माझा त्याग केला आहे आणि—आणि मला, जिवंत पाण्याचा झऱ्याला

सोडला आहे; आणि त्यांनी आपणांसाठी हौद खोदले आहेत, ज्या फुटलेल्या आहे, आणि गळत आहे."

103 पाहा, काहीतरी, त्यांना काहीतरी हवे होते जे ते नियंत्रित करू शकतील, किंवा दाखवू शकतील की त्यांनी काय केले आहे. हाच—तो संघटित धर्माचा मूर्खपणा आहे. ते नेहमी प्रयत्न करतात, कारण त्यांना त्यात स्वतःचे काहीतरी असलेच पाहिजे. त्यांना या सर्व प्रणाली आणि संस्था हव्या होत्या, आणि या गोष्टी, "आणि आता मी *याचा* भाग आहे." केवळ देवाची नम्र मुले होण्याऐवजी, त्यांना काहीतरी हवे आहे जे ते स्वतःला दाखवू शकतील. परमेश्वराला ते त्याच्या मार्गाने करू देण्याऐवजी, त्यांना ते त्यांच्या मार्गाने करायचे होते. आणि तशाच प्रकारे आज प्रणालींने मंडळीला अशा अवस्थेत आणले आहे. नाही...प्रत्येक प्रणाली, एकाला ते *असे* हवे असते, कोणाला ते *तसे* हवे असते. जर तुम्ही मेथडिस्ट असाल, तर तुम्ही *असे* असले पाहिजे. एक बॅप्टिस्ट, *अशा* रीतीने. प्रेस्बिटेरियन, कॅथलिक, आणखी जे काही, त्यांच्याकडे त्यांच्या प्रणाली आहेत. त्याच्या विरोधात काहीच नाही, परंतु मी त्याविषयी बोलत नाही.

104 मनुष्याला त्याच्या मार्गाने करायचे असते, आणि देवाकडे ते करण्याचा त्याचा मार्ग आहे. आणि तो म्हणाला, "तुम्ही तुझा मार्ग धरून बसला आहात, तुटलेली हौद; आणि माझा मार्ग, जीवनाचा मार्ग स्विकारणार नाही."

105 आणि आजही तेच आहे. त्यामध्ये थोडासाही फरक पडलेला नाही. विचार करा यात किती मूर्खपणा की एखादा मनुष्य शुद्ध, साफ पाणी बुडबुडत वर येणाऱ्या विहिरीला सोडून देतो, आणि मग त्याला त्या तुटलेल्या हौदाकडे जायचे आहे जे त्याने स्वतः बनवले आहे, आणि स्वतःसाठी एक हौद खोदतो, त्यात धान्याच्या कोठाराच्या छपरावरचा कचरा वाहत येऊन पडतो, मग त्यातूनच पाणी पितो. त्या व्यक्तीमध्ये नक्कीच काहीतरी मानसिक बिघाड आहे.

106 आणि जेव्हा एखादा मनुष्य शास्त्रलेखाच्या—एका धार्मिक संस्थात्मक संकल्पनेला चिकटून राहतो, पवित्र आत्मा स्विकारण्याऐवजी, जो शास्त्रलेख सिद्ध करतो आणि ते तुम्हाला वास्तविक बनवितो, त्या व्यक्तीमध्ये काहीतरी आध्यात्मिक चुक आहे. ते अगदी बरोबर आहे. निश्चितच, पवित्र आत्मा! प्रत्येकाकडे त्यांच्या बायबलचा अनुवाद आहे, तुम्हाला काय वाटते ते योग्य आहे. परमेश्वराला तुमच्या मदतीची गरज नाही. परमेश्वराला तुमच्या अनुवादची गरज नाही.

107 परमेश्वर स्वतःचा अनुवादक आहे. परमेश्वर अर्थ लावतो जसा तो—जसा तो म्हणतो तो ते करील. प्रभूने सुरुवातीला म्हटले, "तिथे प्रकाश होऊ दे," आणि तिथे प्रकाश झाला. त्याला कोणत्याही अर्थ लावण्याची गरज नाही. तेच परमेश्वराने केले. तो म्हणाला, "एक कुमारी गर्भवती होईल," ती झाली. त्याला कुठल्याही अर्थ लावण्याची गरज नाही. त्याने सांगितले होते, "मी माझा आत्मा सर्व देहावर ओतीन," त्याने तसे केले. त्याला कुठल्याही अर्थ लावण्याची गरज नाही. परमेश्वर सिद्ध करून स्वतःच आपल्या वचनाचा अर्थ लावतो, प्रकट करून, आणि सिद्ध करून.

108 त्याचप्रकारे संदेष्टा हा देवाचा आहे हे सिध्द झाले. तो म्हणाला, "जर तुमच्यामध्ये कोणी असेल, जो आत्मिक किंवा एक संदेष्टा आहे, मी प्रभू मी त्याला दृष्टांतात प्रकट करीन, त्याच्याशी स्वप्नांद्वारे बोलेन. आणि तो जे म्हणतो तसे घडते, तेव्हा त्याला भिऊन राहा; परंतु जर तसे घडत नाही, तर ते करु नका."

109 तेच घडते जेव्हा परमेश्वर त्याचे वचन बोलतो, आणि मनुष्य म्हणतो, "वचन *हेच* आहे," आणि ते तशाप्रकारे घडते, तर परमेश्वर ते करत आहे.

110 परंतु जर तो म्हणतो, “हे *असे* आहे, आणि ते दिवस संपले,” का ते संपूर्ण घेतो... तो भुकेल्या मुलांच्या हातातल्या भाकरीकडे, हात पोहोचवतो, आणि ती त्यांच्याकडून काढून घेतो; आणि ते उपाशी राहतात. जेव्हा ही विहीर तिथे होती तेव्हा तुम्हाला त्या हौदातून पाणी का प्यावेसे वाटेल?

111 आता जीवनाचा झरा काय आहे? जीवनाचा झरा, जीवंत पाण्याचा झरा काय आहे? एका विहिरीसारखे, आपण त्याची तुलना करू शकतो.

112 आता माझी इच्छा आहे की तुम्ही हौद आणि जिवंत पाण्याचा झऱ्यामधील फरक लक्षात घ्या; विहीर, आणि तिथे एक जुने तुटलेले हौद कीटक, सरडे, बेडूक, जंतू, आणि आणखी इतर गोष्टीने भरलेले, पाहा.

113 आणि इथे एक विहीर आहे. आता हे पाहा. ते स्व–आधार देणारे आहे. तुम्हाला कोणतीही मोठी प्रणाली आणण्याची आणि त्यामध्ये खूप पैसा आणण्याची गरज नाही. तुम्हाला खूप सदस्यांना सामील करण्याची गरज नाही. ते त्याच्या सदस्यांना, त्यांच्यामध्ये असलेल्या जीवनाच्या आत्म्याचे, कार्य करण्यास आधार देते.

114 लक्ष द्या जे पाणी त्यातून येते, ताजे, शुध्द आणि साफ. एक हौद नाही, काहीतरी जमलेले आहे जे चाळीस, पन्नास वेगवेगळ्या मनांनी घडवलेले, नोंदवलेले आहे, म्हणतात, “*हे* बरोबर आहे, आणि *ते* बरोबर आहे, आणि *ही* संकल्पना,” मग मतदान करतात, ठराव करतात आणि ते करत असताना, आणि मग त्यातून संप्रदाय बनवतात. ते शुध्द आणि साफ, परमेश्वराचे शुद्ध वचन आहे, जे परमेश्वराच्या हातातून आले आहे. ती खरी विहीर आहे.

115 लक्ष द्या, त्याच्या सामर्थ्याचे रहस्य त्याच्यातच आहे. मनुष्य ते शोधू नाही. एक प्रकारचा दबाव, त्याच्या खाली, जो त्याला वर ढकलत आहे.

116 मला आठवते जेव्हा मी, इंडियाना राज्याचा वनरक्षक होतो, मी हॅरिसन परगण्यात जात असे, तिथे एक विहीर, एक झरा होता. तो नेहमी उफाळत राहायचा. आणि फक्त, ओह, असे वाटत होते की ती सर्वात आनंदी गोष्ट होती. जमिनीवर बर्फ असो, हिमकणांनी गोठलेले असो, कितीही थंडी असो, तरी तो सतत उफाळत राहायचा; जिथे जुनी माणसाने बनवलेले तलाव आणि टाक्या, बेडूक वगैरे सगळे, बाहेर घट्ट गोठून गेले होते.

117 आणि हे दर्शविते की कोणताही संप्रदाय, थोड्याशा आत्म्याच्या कमतरतेमुळे किंवा वातावरणाच्या थोड्याशा बदलमुळे, ते गोठून जाईल. परंतु देवाची विहीर, तो—तो काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे, तो झरा सर्व गोष्टी उफाळून बाहेर टाकतो आणि ढकलून काढतो. आणि त्यात सुरुवातीपासूनच, काहीही नाही. आणि जर काहीही त्यात घुसले, ते त्याला बाहेर ढकलते.

118 तो असा उफाळत होता, आणि मी म्हणालो, एका दिवशी तिथे बसलो, विचार केला, “मी विचार केला की मी त्या झऱ्याशी, काही क्षणासाठी बोलेन.” मी माझी टोपी काढली, आणि मी म्हणालो, “तू कशासाठी इतका आनंदी आहेस? तू इतका उफाळून का वाहतोस? कदाचित हे असे असेल कारण हरिण कधीतरी, तुझ्यापासून पीत असेल.”

जर तो बोलू शकला असता, तर तो म्हणाला असता, “नाही.”

मी म्हणालो, “कदाचित मी तुझ्यापासून पितो म्हणून.”

“नाही, ते तसे नाही.”

119 मी म्हणालो, “बरं, तुला इतके शुध्द, इतके साफ कोण बनवतो? तर ते काय—काय आहे, जे सतत उफाळत राहते, तुला आनंदाने फुलवत राहते, आणि तुला कोणतीही थंडी गोठवू शकत नाही? तुम्ही हवेत उडत आहा, आणि तिथे काहीच नाही, शुध्द पाणी.”

120 जर ती माझ्याशी बोलू शकली असती, तर तुम्हाला माहीत आहे ती विहीर काय बोलली असती? तिने म्हटले असते, “भाऊ ब्रॅन्हम, हे मी फुलवत नाही, माझ्यामागे काहीतरी आहे, मला फुलवते.” आणि तशाचप्रकारे हे आहे…हा शब्द थोडा कमकुवत आहे, पण तुम्हाला माझा अर्थ कळतो.

121 आणि त्याचप्रमाणे हे नव्याने जन्मलेल्या अनुभवाबरोबर आहे. तुम्हाला त्याला थांबवता येणार नाही. तो तुमच्यातील एक—एक पाण्याचा झरा आहे, जो उफाळत अनंतकाळच्या जीवनात वाहतो. पाहा, त्याबद्दल काहीतरी आहे, ज्याच्याशी तुमचा काही संबंध नाही. मनुष्याने बनवलेल्या टाक्या कदाचित गोठू शकतात, आणि ते आत्मिक जागृती आणि सर्व गोष्टींसाठी भीक मागतील; परंतु एक मनुष्य जो त्या झऱ्याखाली आहे, जो त्या झऱ्यात राहतो, हे दिवस आणि रात्र आहे! नाही, तुम्हाला स्थानिक पावसाची आणि स्थानिक जागृतीची वाट पाहण्याची गरज नाही. तुम्ही त्याने पूर्ण भरलेले आहात. “मी त्याला जीवनाचा झरा देईन, जो त्याच्यात, उफाळत राहतो.” त्यामध्ये काहीतरी आहे, जे दररोज ताजे, शुध्द आणि साफ आहे. तो तुमच्या हृदयात आणि मुखात असलेला परमेश्वराचा शुद्ध, अपभ्रष्ट न झालेला वचन आहे, जो स्वतःच स्वतःला प्रमाणित करतो, स्वतःच बोलतो. मला फरक पडत नाही की पाऊस पडत आहे का, बर्फ पडत आहे का, हवामान कसंही असो, तुम्ही अजूनही आनंदी आहात कारण पवित्र आत्मा तिथे आत उफाळत आहे. ती गुप्त सामर्थ्य आहे. लक्ष द्या. ओह, त्याचे रहस्य त्यामध्ये आहे.

122 तो स्वतःहून देतो, मुक्तपणे, जो कोणी प्यायला आणि त्याच्या साराचा उपयोग करायला इच्छुक असेल त्याला. आता तुम्ही निवड करू नका, असे म्हणून की, “ठीक आहे, आता मला फक्त मेथडिस्ट मंडळीकडे जाणे आहे कारण मी एक मेथडिस्ट आहे, जागृतीसाठी. मला *इथे* जावे लागेल, परंतु (जर) मला पेंटेकॉस्टलमध्ये जावे लागेल कारण मी पेंटेकॉस्टल जागृतीवादी आहे.” मी तुम्हाला सांगतो, जेव्हा तुमच्याकडे पाण्याचा झरा उफाळत आहे, तो झरा, जेव्हा तुम्ही तिथे पाणी पिता, तिथे काही फरक नाही, तुम्ही कोणत्याही येणाऱ्याला देता. तुम्ही कॅथलिक, प्रोटेस्टंट, यहुदी, निरीश्वरवादी, किंवा ते काहीही असो, जीवनाची आशा देण्यास तयार आहात. तुमच्यामध्ये खरोखर, खरोखरच काहीतरी आहे, जे ते करत आहे.

123 तुम्हाला त्याविषयी आणखी एक गोष्ट लक्षात येते, तुम्हाला त्यात पंप करण्याची गरज नाही. तुम्हाला ते ओढून, वर उचलण्याची गरज नाही. मी ते इतक्या वेळा पाहिले आहे की ते मला त्रास देतो, काहीतरी पंपाने काढणे; खूप सारे संगीत वाजवत, आणि वर–खाली उड्या मारत, किंवा—किंवा शहरात मोठ्या प्रमाणावर साहित्य, आणि प्रचंड मोठे चिन्हे, “या क्षणाचा नायक.”

124 या क्षणाचा एकच नायक आहे, आणि तो येशू ख्रिस्त आहे, जो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. देवाकडून एकच संदेशवाहक आहे, आणि तो—तो येशू ख्रिस्त आहे. हो, महाशय.

125 तुम्हाला हे वर उचलण्याची किंवा खाली खेचण्याची गरज नाही. किंवा, तुम्हाला त्यात सामील होण्याची गरज नाही, नको. तुम्ही ते मुक्तपणे घ्या. आमेन. “मी जिवंत पाण्याचा झरा आहे; तू मला सोडले आहेस, जाऊन स्वतःसाठी काही टाक्या बनवण्यासाठी.” आता तुम्हाला ते पंप करण्याची, पंप करण्याची, खेचण्याची, आणि

त्यात जोडण्याची, ते खणण्याची गरज नाही, अजून दुसरे काही नाही. तुम्हाला फक्त ते मुक्तपणे घ्यावे लागेल.

126 तुम्हाला गाळणाऱ्या कापडासाठी मनुष्याने बनवलेल्या धर्मशास्त्राची गरज नाही, जे तुला सांगेल की त्यातून काय गेले, ते काय केला. अजिबात नाही. काही मनुष्याने बनविलेले काही शैक्षणिक प्रणालीचे धर्मशास्त्र, आत्मधर्मी धर्म *ह्या* मध्ये, *ह्या* मध्ये, किंवा धार्मिक प्रणालीचे काही हौद; तुम्हाला त्याची गरज नाही. ते तिथे असण्याची गरज नाही. तुम्ही त्यावर एखादे कापड ठेवले तरी, ते सरळ हवेत फेकून देईल. त्याचा त्याच्याशी काहीही देणंघेणं नाही. ते स्वतःच उभे आहे! हे परमेश्वराचे सामर्थ्य आहे जे जीवनात उगवते. एक मनुष्य त्यासारख्या गोष्टी, एका प्रणालीमध्ये सामील होण्यासाठी का सोडेल, हे मला सांगणे शक्य नाही. त्याला गाळणाऱ्या कापडाची गरज नाही. त्याला त्याची गरज नाही. त्याला गरज नाही...त्याला भरुन घेण्यासाठी स्थानिक पावसावर अवलंबून राहण्याची गरज नाही. ते नेहमी पूर्ण भरलेले असते. आमेन.

127 एक मनुष्य, मी त्यांना बोलताना ऐकतो, “आज मी अगदी खचून गेलो आहे.” ओह, माझ्या देवा!

128 ओह, मला आनंद आहे की मी परमेश्वराच्या उपस्थितीत राहत आहे, जरी गोष्टी नीट चालल्या असो किंवा नसो. तो माझे जीवन आहे. आमेन. तो आमचे जीवन आहे. तोच जीवन आहे, भरपूर जीवन. हो, महाशय. आणि—आणि पाहा तो आपल्यासाठी काय करतो. त्याचे सामर्थ्य आणि पवित्रता त्याच्यामध्येच आहे. त्याला हौदाच्या किंवा इतर कोणत्याही प्रणालीच्या प्राथमिकतेची गरज नाही.

129 कोणी म्हणेल, “तुमचे सहभागिता पत्र काय आहे? तुम्ही एक चांगले बॅप्टिस्ट आहात का ते पाहूया. मी बघतो की तुमच्याकडे कार्ड आहे का.” किंवा—किंवा, “...एक चांगला पेंटेकॉस्टल...जर तुम्ही एकत्व असतील...द्वित्व...त्रित्व.” किंवा—किंवा “...आणखी जे काही.” पाहा, त्याला कोणत्याही आधाराची गरज नाही. तो नेहमीच चालू असतो. होय.

130 तुम्हाला माहीत आहे, माझ्याकडे पूर्वी हे जुने हौद होते, मला तिथे पाणी ओतून, पुन्हा आणि पुन्हा आणि पुन्हा चालवावं लागायचं, त्या जुन्या पंपाला सुरू करण्यासाठी; म्हणजे, त्यात अजून थोडं पाणी ओतलं आणि किडे वगैरे बाहेर काढण्यासाठी त्यात बरेच किडे वगैरे ओतले. हे अगदी तशाच प्रकारे यातील काही पद्धतशीर जागृती आहे.

131 परंतु, परमेश्वराचे आभार माना, “तिथे रक्ताने भरलेला झरा आहे, जिथे पापी त्या प्रवाहाखाली बुडतात!” तुम्ही मंडळीचे सदस्य बनवत नाही; तुम्ही त्यांच्यातून ख्रिस्ती बनवतील जेव्हा ते त्या झऱ्याकडे येतात.

132 तुम्ही हा जिवंत पाण्याचा झरा, अशा पाण्याच्या तळ्यात पिण्यासाठी का सोडता?

133 पंपण्याची गरज नाही; त्याची सामर्थ्य स्वतःमध्ये आहे. त्याला आधाराची गरज नाही, होय महाशय, कारण (स्वतः) त्याचा स्वतःचा जीवन त्यामध्ये आहे. त्याचप्रकारे परमेश्वराचे बीज मनुष्याच्या हृदयात असते. परमेश्वराचे जीवन व्यक्तीमध्ये आहे, मंडळीत नाही, तुमच्यामध्ये, ते तुमच्यामध्ये आहे, तुम्हीच आहे ज्याच्यामध्ये जीवनाचे अंकुर आहेत.

134 त्याची फक्त एक चव पुरेशी आहे, सर्व प्रकारच्या पाळकांना खात्री देण्यासाठी. कॅथलिक धर्मगुरुला विचारा, बॅप्टिस्टला विचारा, ते काहीही असो. ह्या महान ताज्या पाण्याची फक्त एक चव, मी तुम्हाला सांगतो, ते खात्री देते की तेच सत्य आहे. तुमचा

भुकेलेला प्राण, कसाही असो, तो तहानलेल्याला खात्री देतो, कसाही. आता जर तुम्ही तहानलेले नाही...हा लहान बॅप्टिस्ट, सुरुवातीला, त्याला तहान लागली नव्हती; परंतु जेव्हा त्याला तहान लागली, त्या पाण्याची चव खूप चांगली लागली. ते बरोबर आहे, परंतु तुम्हाला तहानलेला असले पाहिजे, "धन्य तहान," जसे येशूने ते म्हटले. "धन्य आहात तुम्ही जे न्यायीपणाचे भुकेले व तान्हेले आहे, कारण ते संतुष्ट होतील" आमेन. येशूने तसे म्हटले, मित्रा. होय, महाशय, तो तहानलेल्यांसाठी एक धन्य झरा आहे.

135 कोणाला ते दलदलीत जाण्यासाठी बदलायचे आहे? तुम्हाला एक विहिरीच्या जागी दलदलीच्या पाण्यामध्ये जाण्यास कसे आवडेल, किड्यांनी आणि सर्व प्रकारच्या मानवनिर्मित सिद्धांतांच्या दूषणांनी भरलेले, ज्याबद्दल देव म्हणाला की, "त्याच्या वचनात एकही भर घालतो, किंवा त्याचे एक वचन काढून घेतले, त्याचा भाग जीवनाच्या पुस्तकातून काढला जाईल"?

136 आणि जेव्हा परमेश्वराने अभिवचन दिले की तो हे वचन प्रत्येक पिढ्यामध्ये सिद्ध करील, "कारण हे वचन तुम्हाला आणि तुमच्या लेकरांना आहे, आणि जे दूर आहेत त्या सर्वांना, जितक्यांना प्रभु आपला परमेश्वर बोलावील तितक्यांना दिले आहे," तुम्ही का बरे एखाद्या पद्धतशीर पंपावर दाब द्याल, जो अनेक वर्षांपासून दूषित झाला आहे, त्या जुन्या मान्नापासून? कदाचित मान्ना ठीक असेल, त्याच्या विरुध्द काहीच नाही, मार्टिन लुथरच्या काळात, *ह्या* आणि *त्या* काळात, आणि इतर सुधारकांच्या काळात, त्याविषयी काहीच नव्हते; परंतु तो मान्ना आहे जो फार पूर्वी पडला.

137 जर आपण बायबलमध्ये पाहिले, तर त्यांना ते रोज उचलावे लागले. त्यांना नविन मिळवावे लागले. ते थोडे जुने झाल्यावर, कुजले. ते तुटल्याशिवाय सडू शकत नाही. त्यात जंतू असले पाहिजेत, किंवा काहीतरी असले पाहिजे—ज्यामुळे ते कुजेल. आपल्याला माहीत आहे की ते तसे आहे.

138 आणि तशाच प्रणाली आहेत! एका महान जागृतीनंतर दुसऱ्या जागरणापर्यंत ते तिथे पडून राहते, आणि ते दूषित होते व किड्यांनी भरून जाते, आणि जसे एक हौद हलणाऱ्या शेपटक्यांनी भरलेले असते, ज्यांना आपण पूर्वी म्हणायचो, त्या जुन्या लहान किड्यांनी जे आत हलत असतात.

139 आणि हेच आज बऱ्याच लोकांचा अनुभव आहे. ते—ते फक्त हलणाऱ्या शेपट्यांनी भरलेले आहेत, जे एकापासून दुसऱ्याकडे, आणि दुसऱ्यापासून पुढे हलत राहतात, त्या गोष्टी सांगतात ज्यामध्ये सत्य नाही. ते बरोबर आहे, एकापासून दुसऱ्याकडे हलत राहतात,. "मी एक मेथडिस्ट होतो; मी बॅप्टिस्टमध्ये सामील झालो. मी कॅथलिक होतो; मी *हे* व्हायला गेलो. मी *ते* व्हायला गेलो." ते फक्त हलणाऱ्या शेपट्या आहे.

140 ओह, सर्व गोष्टी विसरा, आणि झऱ्याकडे या (आमेन!), वाहती विहीर, ख्रिस्ताची सदैव जिवंत उपस्थिती! मी विश्वास करतो की तो जीवनाचा अक्षय झरा आहे. जितके अधिक तुम्हाला त्यातून मिळते, तितके अधिक ताजे होते, आणि ते जितके अधिक थंड होते, आणि तितके अधिक चांगले होते, आणि तितके अधिक गोड होते. मी आता तेत्तीस वर्षांपासून त्याची सेवा करीत आहे, आणि प्रत्येक दिवस गेल्या दिवसापेक्षा अधिक मधुर होत आहे. मी कधीच नाही...तो म्हणाला जर आपण हे पाणी प्यायलो तर तुम्हाला कधीही तहान लागणार नाही. ते किती महान आहे ते पाहा. ओह!

141 इस्त्राएलने तेच केले जसे अनेक आज करतात, त्यांनी जिवंत पाण्याचा झरा सोडला, स्वतःसाठी हौद खोदण्यासाठी.

142 आता काही क्षणासाठी कृपेविषयी बोलताना, ही देवाची कृपा काय आहे. आपल्याकडे नियम आणि उपनियम आहेत, “आणि जर तुम्ही ह्या मानकापर्यंत पोहोचले नाही... माझ्याकडे एक धार्मिक मोजमापाची काठी आहे; जर तुम्ही या पर्यंत पोहोचले नाही, तुम्हाला पोहोचावे लागणार, नाहीतर तुम्ही आत येऊ शकत नाही,” आणि इत्यादी. परंतु परमेश्वर आपल्याला कृपेने वाचवतो, मोजण्याच्या काठीने नाही. पाहिले? परंतु परमेश्वर, आता कृपेविषयी बोलताना, हे कसे घडले, की त्याच्यापासून प्यावे, ह्या मापाच्या काठीने...

143 कुरकुर, कुरकुर करणारा इस्त्राएल. पाहा, तो म्हणाला, “आणि मी तुला पुन्हा भेट देईन.” वचनलेखात लक्ष द्या. लक्ष द्या, तो त्यांना पुन्हा भेट देण्यासाठी, प्रयत्न करणार आहे. लाल समुद्राजवळ, कुरकुर करणाऱ्या इस्त्राएल लोकांना, स्थिर झालेल्या मिसरच्या पाण्यातून त्याच्या मागे जाण्याचे आमंत्रण मिळाले, जेणेकरून ते स्वतंत्र लोक होऊ शकतील. ते गुलाम होते. त्यांना त्याच्याबरोबर स्वतंत्र लोक होण्याचे आमंत्रण दिले होते. मृत समुद्रातून बाहेर या, मृत समुद्रातून; नाही, खरं म्हणजे, लाल समुद्रातून बाहेर या, आणि मग त्या मार्गाने रानात जा. ह्यासाठी की त्यांच्यामध्ये आणि नक्कल करणारे जे त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, सुंता न केलेल्या लोकांमध्ये विभाजन आणण्यासाठी.

144 ओह, त्यामुळेच गोंधळ झाली. त्यांच्यातील प्रत्येक जण अगदी रानात नष्ट झाला..., किंवा, अगदी—अगदी समुद्रातच, फारो आणि त्याचे सैन्य. ते त्यांनी पाहिले की मनुष्य अलौकिक सामर्थ्याने चालत आहेत, म्हणून ते परत आले आणि त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न केला, आशीर्वादात सामील न होता. आणि जेव्हा त्यांनी तसे केले, त्यांचा नाश झाला. ही शारीरिक तुलना आहे.

145 एक मनुष्य जो तसे करण्याचा प्रयत्न करतो, काहीतरी नक्कल करण्याचा प्रयत्न करतो, मग तो खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीबरोबर शारीरिक तुलना करत आहे.

146 माझ्या भारतीय भावाला ते माहीत आहे. बॉम्बेभोवती या आणि तुम्ही तिथे लोकांना पाहाल, हिंदू आणि इतर लोक, खिळ्यांवर झोपणारे आणि...काचेवर चालणारे आणि—आणि अग्नीत चालणारे, ते काय करु शकतात हे दाखवण्यासाठी, आणि अशा गोष्टी... तिथे जंगलात हे काही मनुष्याची दैहिक नक्कल आहे, आपल्या दैवतासाठी अर्पण करत आहे.

147 आपण पाहतो की सर्व धार्मिक जीवनात, शारीरिक नक्कल, कोणीतरी दुसऱ्यासारखे बनण्याचा प्रयत्न करत आहे. फक्त एकच उदाहरण आहे ज्याचासारखे तुम्ही व्हावे, ते येशू ख्रिस्तासारखे आहे, जो वचन होता. आणि मग जेव्हा परमेश्वराचे वचन तुमच्याकडे येते, ते तसेच असेल.

148 परंतु देवाने त्यांना कसेही करुन, वचन दिलेल्या देशात नेले. त्यांनी, प्रत्येक टाकी पण पाहिली, जेव्हा ते रानातून प्रवास करत होते, ते वेगळे झाल्यानंतर, त्यांनी पाहिले की प्रत्येक टाकी त्यांच्यासाठी कोरडी होती.

149 आणि तुम्हाला तेच पाहण्यास मिळेल, भाऊ, जेव्हा तुम्ही वचन दिलेल्या देशाच्या प्रवासाला सुरुवात कराल. तुम्हाला दरवाजे बंद दिसतील. जसे त्या लहान प्रचारकाने म्हटले, एक अँग्लिकन, किंवा जे काही तो होता, आणि, पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, त्याच्या मंडळीने त्याला बाहेर काढले. पाहा, त्याने इतक्यांना पवित्र आत्मा प्राप्त करून दिला होता, तोच त्याचा अंत होता.

150 आणि आम्हाला…आणि इस्त्राएलला हीच गोष्ट, उदाहरण म्हणून, त्यांच्या वचन दिलेल्या देशाच्या प्रवासात आढळली. सर्व टाक्या कोरड्या होत्या. हो, त्यांच्या प्रवासात त्यांनी त्याच्या अभिवचन दिलेले वचन पालन केले, त्यांच्या प्रवासात, टाक्यांमध्ये, त्यांना कोरडेपणा आढळला. आता त्यांना असे आढळले की प्रवासासाठी, त्या टाकी—टाक्यांवर अवलंबून राहू शकत नाही.

151 आणि जर तुम्ही परमेश्वराच्या वचनाच्या पालन करण्यामध्ये प्रवास करणार आहात, आणि *इथे* सामील आणि *तिथे* सामील होण्याचा प्रयत्न करत आहात, तुम्हाला कळेल की जगात अशी एकही टाकी नाही जो त्याला आधार देईल. मुळीच नाही. तू एक व्यक्ती आहेस. परमेश्वर तुला ज्या मार्गाने नेऊ इच्छितो, जसे त्याला मार्गदर्शन करायचे आहे. मग, आज आपल्याला तेच पाहण्यास मिळते, आणि सर्व टाक्या कोरड्या झाले आहे.

152 परंतु अभिवचन, सदैव खरे आहे, परमेश्वराला जो आपल्या लोकांशी केलेले वचन नक्कीच पाळतो. त्याने वचन दिले होते की त्यांच्या सर्व गरजा तो पूर्ण करील, आणि तसेच त्याने केले. रिकाम्या, कोरड्या टाक्यांमध्ये, जरा त्याचा विचार करा, आणि इस्त्राएल तक्रार करत आहे, वाळवंटात, त्यांच्या प्रवासात, त्याने आपला सेवक–मार्गदर्शक, संदेष्टा मोशे याला, एका बाजूला बोलावले, त्याने जिवंत पाण्याचा झरा उघडला, एका प्रहार झालेल्या खडकातून, ह्यासाठी की त्याचे विश्वास करणारे लेकरांचा नाश होणार नाही.

153 या दिवसात, ते माझ्यासाठी, कृपेविषयी बोलत आहे. आपण अयोग्य आहोत. ज्याप्रकारे आपण वागलो, ज्या प्रकारे आपण जगलो, आपण पात्र नाही.

154 परंतु परमेश्वर, या दिवसात, जसे या सकाळी, पाहा, मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेस्बिटेरियन, कॅथलिक, आणि सर्वांसाठी, त्याने एक झरा उघडले आहे. इब्री 13 हे सिध्द करते, की तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. म्हणून हे—हे सत्य ठरते, योहान 3:16, "देवाने जगावर इतके प्रेम केले की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, ह्यासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, परंतु त्याला सार्वकालिक जीवन मिळावे."

155 आणि ते एका मिश्र कारणासाठी वर उचलण्यात आले, कारण लोक कुरकुर व पाप करत होते, आणि ते सापांनी दंश केलेले होते आणि ते मरत होते; आणि त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी, आणि त्यांचे आजार बरे होण्यासाठी.

156 आणि तोच झरा आहे जो आज आपल्यासाठी खुला आहे, आपल्या तारणासाठी आणि आपल्या आरोग्यासाठी, शारीरिक आरोग्यासाठी. "कारण तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे."

157 आणि जेव्हा त्या खडकाने ज्यावर देवाच्या अभिवचनाद्वारे प्रहार केला होता, त्याने आज्ञा केली होती, ते शुद्ध, निर्मळ पाण्याचे झरे उफाळून बाहेर येत होते; नाही—साचलेले नाही, दूषित नाही, परंतु परमेश्वराची स्वतःची उपस्थिती. शुध्द पाणी, आणि ज्यांनी प्याले त्यांना सर्वांना त्याने वाचवले. आता आपल्याला माहित आहे की ते खरे आहे, कारण आपण ते जुन्या करारात वाचतो, एक नमूना म्हणून.

158 आता, तुम्हाला ते खेचण्याची, पंप करण्याची, त्यात सामील होण्याची, त्याचा वापर कसा करायचा हे शिकण्यासाठी धर्मशाळेत जाण्याची गरज नव्हती. तुम्हाला तिथे ते कसे वापरावे हे सांगतील, पाहा, "ओह, तुम्ही, जर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला आहे, आम्ही त्यावर विश्वास करतो, परंतु तसेच तुम्ही—तुम्ही ते *अशा* प्रकारे करता."

159 परंतु, तुम्ही पाहा, त्यावर कोणाचे नियंत्रण नाही. तुम्ही पवित्र आत्म्याचा उपयोग करत नाही; पवित्र आत्मा तुमचा उपयोग करतो, पाहा. पाहा, तुम्ही नाही, तुम्ही पवित्र आत्म्याचा उपयोग करणार नाही, पवित्र आत्माने तुम्हाला नियंत्रणात घेतले आहे. एखादे भेटवस्तू म्हणजे अशी गोष्ट नाही की तुम्ही ती घेतली, चाकूसारखी, आणि वापरून पेन्सिल धारदार केली. हे स्वतःला देवाकडे समर्पित करणे आहे, आणि स्वतःला मार्गातून बाहेर काढणे आहे ज्याने पवित्र आत्मा तुमचा उपयोग करु शकेल.

160 लक्ष द्या, त्यांना ते कधीच पंप करावे लागले नाही किंवा ते ओढावे लागले नाही, किंवा त्यांना कधीच विचारावे लागले नाही, "आता आपण हे पाणी कसे वापरावे?" कारण, त्यांना त्याचा उपयोग कसा करायचा हे माहीत होते. ते तहानलेले होते. त्यांना माहीत होते की ह्याचे काय करायचे आहे.

161 आणि त्याचप्रकारे एक पुरुष किंवा स्त्री, कोणताही, तो कोणत्याही पंथाचा किंवा संप्रदायाचा असो. जर तो देवासाठी तहानलेला असेल, त्याला पुन्हा धर्मशाळेत धावण्याची गरज नाही, जसे ह्या अँग्लिकन भावाने केले, किंवा ब्रिटीश भावाने, काल रात्री, परत जावे लागेल आणि सल्ला घ्यावा लागेल की कसे, अँग्लिकन मंडळीकडे, त्याला मिळालेल्या महान दानाचा त्याने कसा उपयोग केला पाहिजे, अन्य भाषेत बोलणे, आणि त्याने हे कसे केले पाहिजे. त्यांनी त्याला सुरुवातीला बाहेर काढले असते. पाहिले? तो तहानलेला होता, म्हणून परमेश्वराने त्याला भरले. एवढंच आहे. तो तहानलेला आहे, तर मग तो भरतो.

162 तुला काहीही नियंत्रण ठेवण्याची गरज नाही, कुणीतरी तुला सांगेल त्याचं काय करायचे ते. परमेश्वर प्रत्येक व्यक्तीला जसे—त्याला हवे तसे तुम्हाला मार्गदर्शन करतो. तुम्ही स्वतः एक—एक व्यक्ती आहात. तुम्ही परमेश्वराचे भाग आहात. तुमची जागा कोणीही घेऊ शकत नाही. आणि तिथे कुणाकडे जाण्याची काही गरज नाही, आणि आता म्हणावे, मला "ह्याच्या बरोबर हे करावे लागेल," किंवा मला "त्याच्या बरोबर *ते* करावे लागेल." नाही, महाशय. परमेश्वर त्याचा वापर करतो जसे—जे त्याला पाहिजे. जेव्हा तुम्ही तहानलेले असता, तुम्हाला प्यायचे ते कळते.

163 आणि जर तुम्हाला आज सकाळी तहान लागली असेल, तर त्यातून प्या, हेच तुम्हाला करायचे आहे. परमेश्वराने त्यांच्या तहानेसाठी एक मार्ग दिला, ज्याने तहानलेली मुले त्याच्यातून मुक्तपणे सहभागी होऊ शकतील. आणि परमेश्वराने प्रत्येक पुरुष आणि स्त्रीसाठी ह्या सकाळी, जे भुकेलेले आणि तहानलेले आहेत, त्यांच्यासाठी मार्ग प्रदान केला आहे. कदाचित इथे लोक बसलेले असतील, ज्यांचे तारण झाले नसेल. इथे असे लोक बसलेले आहेत जे तारण मिळण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

164 इथे काही लोक आहेत, इथे मंडळीचे सदस्य म्हणून बसलेले आहेत, तुम्हाला योग्य ते करायचे आहे, परंतु तुम्ही एका टाक्यातून पित आहात. ते तुम्हाला हे सत्य कधीच सांगणार नाहीत.

165 एकच गोष्ट, यायचे, ती म्हणजे परमेश्वराचे अभिवचन स्वीकारून त्या झऱ्याकडे यायचे; मग तो तहान भागवेल. "जो ह्या झऱ्यातून पितो त्याला पुन्हा कधीही तहान लागणार नाही."

166 आता पाहा, त्याने कसे—कसे मुक्त केले त्यांना—त्यांना ज्यांनी हे पाणी स्वीकारले, कृपेने, आणि प्रणाली किंवा शिक्षणाच्या हौदाद्वारे नाही. तो त्याचे वचन सिद्ध करतो, एक जीवन देणारे स्रोत आहे. इथे किती जणांना माहीत आहे की तुम्हाला जीवन

मिळाले जेव्हा तुम्ही ते वचन आणि त्याचे पाणी घेतले, तुम्हाला फक्त माहीत आहे की तुम्हाला जीवन मिळाले आहे?

167 आपण, उदाहरणार्थ, दुसरी उदाहरणे घेऊया, किंवा दोन, आणि मग मी काही क्षणातच समाप्त करणार आहे. माझ्या—माझ्याकडे ते बटण कुठेतरी असले पाहीजे. परंतु पाहा. मी फक्त बोलत राहतो, परंतु मला तसे करायचे नाही. पाहा, आपण एक उदाहरण घेऊया, फक्त काही लोक.

168 आपण त्या स्त्रीला याकोबाच्या हौद, खोदलेल्या विहीरीजवळ याला घेऊया. तिथे ती बसली होती. त्या स्त्रीला फक्त एवढंच माहीत होते, की हे हौद होते तिथे ती पाणी घेण्यासाठी येत होती. आणि विहीरीसमोर, तिला त्या छोट्या दृश्यात, एक मनुष्य, एक यहुदी बसलेला दिसला. आणि ती एक शोमरोनी होती, ते सूखार शहर आहे. आणि आपण पाहतो की हा मनुष्य, हा यहुदी, ह्या स्त्रीला एक असामान्य शब्द बोलला, म्हणाला, "मला प्यायला आण."

169 ती आता म्हणाली, "आम्हाला वेगळे केले आहे. तुझा मला असा प्रश्न विचारणे हे योग्य नाही—नाही; तू यहूदी आहेस, आणि मी एक शोमरोनी आहे."

170 तो म्हणाला, "परंतु जर तुला माहीत असते की तू कोणाशी बोलत आहेस, तू माझ्याकडून प्यायला मागशील, आणि मी तुम्हाला असे पाणी देईन की तुला ते पिण्यासाठी ह्या हौदाकडे यावे लागणार नाही; तू उफाळणारे पाण्याचा झरा बन." पाहा जेव्हा तिला समजले की हे सत्य आहे!

171 आता, प्रथम, कोणीही मनुष्य तसे बोलू शकला असता. पण ती म्हणाली, "तुम्ही म्हणता की यरुशलेममध्ये आराधना करावी, आणि आम्ही या पर्वतावर आराधना करतो."

172 तो म्हणाला, "तारण यहूदींपासून आहे. आम्हाला माहीत आहे की आम्ही काय विश्वास करतो. पण," म्हणाला, "मी तुला एक गोष्ट सांगतो," अशा शब्दात, "ना ह्या डोंगरावर, किंवा यरुशलेममध्ये नाही. कारण अशी वेळ येत आहे जेव्हा मनुष्य परमेश्वराची आराधना आत्म्याने आणि सत्याने करील, कारण पिता अशांचा शोध करीत आहे." तो म्हणाला, "जा तुझ्या पतीला घेऊन इथे ये." पाहा, इथे ते सिध्द होते. इथे ती कोणत्या झऱ्याकडे होती ते दाखवतो. म्हटले, "जा तुझ्या पतीला घेऊन इथे ये."

ती म्हणाली, "मला पती नाही."

173 तो म्हणाला, "तू खरे बोलली आहेस." पाहा, ते जणू सरळ विरोधाभासासारखे वाटले, जे त्याने तिला विचारले होते, आणि म्हणाला, "जा तुझ्या पतीला घेऊन ये."

म्हणाली, "मला पती नाही."

174 म्हणाला, "तू खरे बोलली आहेस." म्हणाला, "कारण तुझ्याकडे पाच होते, आणि आता तू ज्याच्या सोबत राहत आहे, तो तुझा पती नाही."

175 त्या स्त्रीकडे पाहा, त्या दिवसाच्या याजकांपेक्षा किती वेगळी होती! त्या दिवसाच्या याजकांनी तीच गोष्ट घडताना पाहिली, आणि म्हणाले, "तो सैतान आहे, टेलिपॅथी किंवा—किंवा बालजबूब आहे." पाहा, वचनात दिलेल्या अभिवचनाला पाहण्यात ते चुकले.

176 पण ती लहान स्त्री कोणत्याही याजकापेक्षा शास्त्रलेखात अधिक पारंगत होती. ती म्हणाली, "महाशय, मला जाणवते की तुम्ही एक भविष्यवक्ता आहात. आम्हाला चारशे वर्षांपासून एकही मिळालेला नाही, मलाखीपासून. परंतु," म्हटले, "आम्ही एकाची वाट

पाहिली, आणि आम्हाला माहीत आहे की एक येत आहे, म्हणजे मशीहा. आणि जेव्हा तो येईल, तो हेच करील.”

येशू म्हणाला, “मी तो आहे.” आमेन.

177 तुम्ही पाहिले काय, तिने तिची बादली याकोबाच्या हौदावर सोडली, ती नगरात धावत गेली; विहीरीने पूर्ण भरलेली! तिने ते पूर्णपणे सिद्ध होताना पाहिले होते, आणि तोच तो जीवनाचा झरा होता. मला तिची ओळख तुमच्याशी करू द्या. तिने ते सोडले; जेव्हा तो जीवनाचे वचन असल्याचे सिध्द झाले. तिने ते सोडले; आणि कळले होते की तोच खडक, ज्यावर रानात मारले होता, तो तेव्हा उपस्थित असल्याचे सिद्ध झाले.

178 मला म्हणू द्या, तोच परमेश्वर जो मागील दिवसात होता, ज्याविषयी आपण इतके बोलतो, तो आता इथे उपस्थित आहे; कोणत्याही धर्मशास्त्राचा ज्ञानाने नव्हे, पण त्याच्या पुष्टीकरणाच्या वैयक्तिक ज्ञानाद्वारे की तो ह्या शेवटल्या दिवसात, त्याच्या मंडळीवर पवित्र आत्म्याचा वर्षाव करील. तो “मी होतो” नाही. तो अजूनही “मी आहे,” वर्तमान काळ आहे, नेहमीच.

179 मग त्या हौदाची चव गेली आहे. आणि तसेच प्रत्येक मनुष्य जो कधी देवाच्या सामर्थ्यात पडतो, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे, सांप्रदायिक प्रणाली त्यांची चव गमावून बसतात. तुम्हाला ते जमलेले बेडूक, आणि सरडे, आणि किडे, आणि असे आणखी काही नको. तुम्ही ताजे आणि शुध्द, परमेश्वराचे वचन, प्रत्येक तासाला तुमच्या प्राणात ताजे असलेल्या झाऱ्यातून पीत आहात. आता जसे आहे, जेव्हा वचन सत्य आहे असे सिध्द केले आहे, अनुभव घ्या आणि पाहा की ते बरोबर नाही का.

180 जरी त्या हौदाने आपली चांगली सेवा केली होती, आपल्या वेळेत चांगली सेवा केली; पण, तुम्ही पाहा, तिथे जीवनाचा झरा होता, याकोबाची विहीर यापुढे, आत्मिक पिण्यासाठी नव्हती. त्यांना वाटले, जर त्यांनी त्या विहिरीतून पाणी प्यायले, तर, सर्व काही ठीक होईल; परंतु आता जीवनाचा झरा स्वतः तिथे बसला होता.

181 आता आम्हाला आमच्याकडे असलेल्या प्रणाली आणि संघटनांची गरज नाही. आपण अंतिम काळात आहोत. आणि परमेश्वराने, ह्या अंतिम काळात, ज्या गोष्टी तो करील, त्याचे अभिवचन दिले. आणि आपण ते वचनाप्रमाणे, पूर्ण होताना पाहतो. आपण सैनिकी सामर्थ्य असलेल्या माणसाला ऐकतो, तो उभा राहतो, थरथरतो आणि म्हणतो, “काहीतरी घडणार आहे.” आपल्याला असे वाटते की पवित्र आत्मा आपल्याला चेतावणी देत आहे की काहीतरी घडणार आहे. आपण पाहतो की सर्वकाही क्रमाने ठेवलेले आहे. मग, ती प्रणाली सोडा आणि झऱ्याकडे या. होय, महाशय.

182 त्याचा उद्देश पूर्ण केला, पण आता ती स्वतः झऱ्याच्या समोरासमोर होती.

183 योहान 7:37–38 मध्ये, येशूने मंडपाच्या उत्साहाच्या शेवटच्या दिवसात म्हटले (तो काय म्हणाला?), “जर कोणी मनुष्य तहानलेला असेल, त्याने माझ्याकडे यावे आणि प्यावे.” अगदी धर्मशास्त्री लोकांच्या समुहात! “जर कोणी मनुष्य तहानलेला असेल, त्याने माझ्याकडे यावे आणि प्यावे. कारण शास्त्रलेखात म्हटले आहे, त्याच्या अंतःकरणातून जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील.”

184 तिथे जिवंत झरा आहे. तोच तो झरा आहे ज्याला लोकांनी आज सोडून दिले आहे. पंथासाठी, त्यांनी जिवंत पाण्याचा झरा सोडला आहे. मी तुम्हाला त्याची ओळख करून देतो. तो, माझ्यासाठी...आणि मी बंद करत आहे.

185 तो, माझ्यासाठी, तो झरा आहे ज्याने हागारचे जीवन वाचवले, आणि मुलाला, जेव्हा ते रानात मरत होते.

186 मी विश्‍वास करतो की तोच तो खडक आहे, यशया 32 मध्ये, तोच तो खडक आहे जो उष्ण प्रदेशात आहे. तो वादळाच्या वेळी आश्रय आहे.

187 जखऱ्या 13, तो एक झरा आहे जो दाविदाच्या घराण्यात उघडला आहे, पापासाठी. मी विश्‍वास करतो की तो तसा आहे. तुम्हाला तसे वाटत नाही का?

188 स्तोत्रसंहिता 36:9 मध्ये, तो दाविदाचा जीवनाचा झरा आहे. तो दाविदाचे शांत पाणी, आणि हिरवी कुरण आहे. तो दाविदासाठी, झऱ्यावरील पाणी आहे.

189 उत्पत्ती 17 मध्ये, तो अब्राहामाचे पोषण करणारे स्तन आहे, अल शद्दाई. परंतु जेव्हा त्याचे जीवन त्याच्यातून निघून गेले, तरीही तो…परमेश्वराने म्हटले.

190 "एक मनुष्य जो शंभर वर्षांचा आहे, हे कसे होणार? मी म्हातारा झालो आहे, माझी पत्नी म्हातारी झाली आहे, हे कसे होऊ शकते?"

191 तो म्हणाला, "मी अल शद्दाई आहे." आता, *एल* "तो" आहे, आणि—आणि *शद्दाई* म्हणजे "स्तन," आणि शद्दाई हे अनेकवचन आहे, ज्याचा अर्थ "मी स्तनधारी देव आहे."

192 जसे एखादे बाळ अस्वस्थ झालेले असते आणि आजारी असते, आणि त्याची शक्ती संपलेली असते, आईच्या कुशीत टेकून आणि तिच्याकडून पिऊन पुन्हा आपली शक्ती परत मिळवतो. निश्चितच. इतकेच नाही…जेव्हा तो पीत आहे, तेव्हा तो अजून अस्वस्थ राहत नाही. आईच्या छातीवर, ते तृप्त होते, ज्यावेळी ते शक्ती मिळवते.

193 आणि कोणीही मनुष्य जो परमेश्वराचे अभिवचन आपल्या हृदयात घेतो, की, "हे वचन तुम्हाला आणि तुमच्या लेकरांना आहे, जे दूर आहेत, जितक्यांना आपला प्रभू परमेश्‍वर बोलावील," आणि त्याचा समोर जा, आणि पुन्हा आपली शक्ती परत मिळव. अस्वस्थ बाळा, विश्वास ठेव! ते विश्वासी लोकांसाठी आहे.

194 विश्वासी कवीसाठी, मी अनेक गाण्यांचा विचार करू शकतो जी कवींनी आपल्यासाठी शोधून काढली आहेत. त्यांच्यातील एकाने एकदा म्हटले होते, तो:

तिथे रक्ताने भरलेला झरा आहे,
इम्मानुएलच्या नसांतून ओढलेले,
जेव्हा पापी त्या पुरात बुडतात,
त्यांचे सर्व अपराधी डाग दूर होतात.

तो मरणारा चोर पाहून आनंदित झाला
त्या झऱ्याला त्याच्या दिवसात;
तिथे मीही, जरी तो जसा अपवित्र होता तसा,
माझी सर्व पापे धुऊन टाकतो.

आणि तेव्हापासून विश्वासाने मी तो धारा पाहिले
तुझ्या वाहणाऱ्या जखमांतून पुरवलेला,
मुक्त करणारे प्रेम हाच माझा विषय आहे,
आणि मी मरेपर्यंत राहील.

195 माझ्यासाठी, तो वेगळे होण्याच्या वचनाचे पाणी आहे, जे तुम्हाला प्रत्येक गोष्टीपासून वेगळे करते जे त्याच्या वचनाविरुध्द आहे. मी विश्वास करतो की तोच तो झरा आहे. होय, महाशय. की, तेच पाणी आहे ज्याने मला मनुष्याने बनवलेल्या हौदापासून वेगळे केले,

आणि जिवंत पाण्याच्या झऱ्याकडे नेले. ओह, मित्रा, मी फक्त...तुम्ही पुढे आणि पुढे सांगत जाऊ शकता, त्या—त्या गोष्टी जो तो आपल्यासाठी आहे! तो अल्फा, ओमेगा आहे. तोच आरंभ आहे, तोच अंत आहे. तो तोच आहे जो होता, जो आहे, आणि येणार आहे. तो दाविदाचे मूळ आणि संतती आहे. तो सकाळचा तारा आहे. तो माझा सर्वस्व आहे.

196 आणि, भाऊ, बहिणींनो, जर तुमच्याकडे नसेल तर...तुम्ही आयुष्यभर, ह्या लहानशा मनुष्याने बनवलेल्या टाकीतून पित आले, का आज सकाळी त्या टाकीला सोडून ह्या झऱ्याकडे येत नाही?

197 आपण काही क्षण आपले डोके झुकवूया. आपली डोके झुकवून...[एक बहिण अन्य भाषेत गाण्यास सुरुवात करते. टेपवर रिकामी जागा—सम्पा.]...माझ्या मते, वेदीवरील आवाहन. आता किती जण?

198 मी—मी खूप घाबरलो होतो, मी—मी तुला खूप वेळ थांबवून ठेवले होते, मला माझा संदेशाचे तुकडे करावे लागले. परंतु मी विश्वास करतो की पवित्र आत्म्याची इच्छा आहे की तुम्ही माझा अर्थ समजून घ्यावा. पाहा, ह्या दिवसात देवाबरोबर नीट जुळुन घेण्यापेक्षा महत्त्वाचे दुसरे काहीच नाही; पाहा, आमचे जेवण, ते काहीही असो, काहीपण. प्रभू इथे आहे. आता, माझ्या आयुष्यात मी ते फक्त एकदाच ऐकले आहे, ह्या वेळेपासून.

199 आता किती...तुम्ही सर्व जे इथे, "किती जण" नाही. इथे तुम्ही सर्व ज्यांना त्यातून प्यायचे आहे, फक्त प्रार्थनेसाठी, काही मिनिटासाठी उभे राहा. परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो. प्रभू तुम्हाला आशीर्वादित करो.

200 आता इथे किती जण, जे—जे आता उभे आहेत, *असे* हात वर करून, म्हणतील, "परमेश्वर, माझ्यावर उतार, मला भर, मला ह्या झऱ्यातून पिऊ दे. आणि मी तेच केले नाही जे योग्य आहे, परंतु माझी—माझी इच्छा आहे की तू त्याबद्दल मला क्षमा करावी. तू माझी पापे धुवावीत अशी माझी इच्छा आहे. आणि या दिवसापासून, मला होऊ—होऊ दे, फक्त..."? जरा पाहा! माझ्या देवा!

तिथे रक्ताने भरलेला झरा आहे,
इम्मानुएलच्या नसांतून ओढलेले,
जेव्हा पापी त्या पुरात बुडतात,
त्यांचे सर्व अपराधी डाग दूर होतात.
त्यांचे सर्व अपराधी डाग दूर होतात.
त्यांचे सर्व अपराधी डाग दूर होतात.
जेव्हा पापी त्या पुरात बुडतात,
त्यांचे सर्व अपराधी डाग दूर होतात.

201 आता हे, तुम्ही जे ख्रिस्ती विश्वासी आहात, तुम्ही ख्रिस्ताला तुमचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकारले आहे, परंतु तुमच्याकडे अजून नाही...आता जर तुमच्याकडे नसेल, तर तो झरा आहे. मला एकच माहीत आहे, तो इम्मानुएलच्या नसातून वाहणारा झरा. आता, आणि जर तुमच्यातील अनेकजण इथे...

202 अगदी तसेच आहे जसे मी परवा रात्री बोलत होतो, त्या छोट्या गरुडाबद्दल जो कोंबड्यांसोबत गोठ्यात चालत होता. आणि त्याला कोंबड्यांशिवाय इतर काहीच माहीत नव्हते, परंतु त्याला एवढे माहीत होते की त्याच्यामध्ये काहीतरी कोंबड्यांपेक्षा वेगळे आहे. आणि मग त्याची आई त्याला शोधण्यासाठी आली, आणि ती वरून ओरडली. ती गरुडाची हाक होती. पाहा, सुरुवातीपासूनच, तो एक गरुड असला पाहिजे, नाहीतर त्याने ती हाक कधीच ओळखली नसती. पाहा, तो...

203 तिथे काहीतरी असले पाहिजे, अंकुरित झालेले, नाहीतर ते कधीच जीवन उत्पन्न करु शकत नाही. आणि जर बीज, परमेश्वराचे वचन, तुमच्यामध्ये आहे, पवित्र आत्मा आता इथे आहे, ते अंकुरित करण्यासाठी आणि ते तुम्हाला वास्तवात आणण्यासाठी.

204 इथे किती जणांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला नाही, तुम्ही तुमचे हात वर कराल का? सर्वीकडे, सर्वत्र, अगदी प्रामाणिकपणे, जर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला नसेल, आणि तुम्हाला तो हवा असेल, तुमचा हात वर करा. तुम्ही कुठेही असाल, फक्त काही क्षणासाठी, तुमचा हात वर ठेवा.

205 आता मला असे हवे आहे की, तुम्ही त्यांच्या भोवती उभे राहून त्यांच्याकडे पाहत असताना, कुणीतरी आपले हात त्यांच्यावर ठेवावेत.

206 मला विश्वास आहे की आताच पवित्र आत्मा प्रत्येकाला भरेल ज्याला तो हवा आहे. आता बाहेर कॅफेटेरियामधील जेवणाबद्दल विचार करू नका. चला, इथल्या या अन्नाबद्दल विचार करूया. हेच ते आहे. हे जीवन आहे. पाहा, हेच जीवन आहे.

207 आता, तुमच्यातील प्रत्येकजण, उजवीकडे वळा, आणि एकमेकांवर हात ठेवा. “आणि त्यांनी त्यांचे हात त्यांच्यावर ठेवले!” आता मी तुम्हाला त्या व्यक्तीसाठी प्रार्थना करायला सांगतो ज्याच्या हातात तुमचा हात आहे...

208 आता बाहेर जाण्याचा विचार करु नका. दुसऱ्या कशाचाही विचार करु नका. जरा विचार करा, आताच, पवित्र आत्मा इथे प्रत्येक व्यक्तीला भरण्यासाठी आहे. तुमचे हृदय खोला, हौदाचे सर्व पाणी बाहेर काढा, आणि म्हणा, “ओह जीवनाच्या झऱ्या, माझ्यामध्ये ये. प्रभू परमेश्वर, मला तुझ्या चांगुलपणाने आणि प्रेमदयेने भर.”

209 प्रभू येशू, तो न संपणारा झरा! मी प्रार्थना करतो, परमेश्वर, की तू त्या प्रत्येकाला भरशील. पवित्र आत्मा इथे उतरू दे. मी प्रार्थना करतो, परमेश्वर, की आपण इतर सर्व गोष्टी विसरून जाऊ; की पवित्र आत्मा आपल्या मध्ये उतरावा, आताच, आणि आम्हाला जीवनाचा पाणी, मुक्तपणे, सर्वत्र देशील. ओह परमेश्वर, ते प्रदान कर. जेव्हा—प्रार्थना आणि गाणे याची निरंतरता, एकत्र मिसळत आहे, प्रभू, ती तुमची उपस्थिती, तुमची दैवी उपस्थिती हे जाणून, आम्हाला झऱ्याकडे यायचे आहे. आपल्याला पवित्र आत्म्याचा वास्तविक, बाप्तिस्मा हवा आहे. प्रभू, हे लोक त्यासाठी प्रार्थना करत आहेत. मी प्रार्थना करतो की, ह्या योग्य क्षणी, ते देवाच्या चांगुलपणाने भरले जातील. परमेश्वर, ते प्रदान कर. तुझ्या मुलांची प्रार्थना ऐक. परमेश्वराचे सामर्थ्य आणि पवित्र आत्मा त्यांच्यावर येऊ दे. परमेश्वर, ते प्रदान कर.

210 ओह देवा आम्ही किती आभारी आहोत हे ताजेपण देण्यासाठी, स्वर्गातील सामर्थ्यशाली देवाच्या उपस्थितीसाठी, जो आपल्या मध्ये उभा आहे! या दुपारच्या वेळी, प्रभु, आम्हाला आत्मिक भोजन दे! प्रभु, आम्हाला तुझ्या मेजावरील अन्न हवे आहे. प्रभु, आता, आम्हाला आत्मिक भोजन दे. आम्हाला आमच्या जीवनात, पवित्र आत्म्याद्वारे भोजन दे. आमचे भुकेलेले प्राण तहानलेले आहेत. जसे तू गीताचा अर्थ सांगितला, “ते कोरड्या भूमीवर पाण्याचा वर्षाव करील.” प्रभू, ते घडू दे. तुझे वचन तुझ्या मुलांच्या हृदयात प्रकट होऊ दे, “कोरड्या, तहानलेल्या जमिनीवर पाणी.” अनंत परमेश्वर, तुझ्या सेवकाची प्रार्थना ऐक, आणि आम्हास तो आशीष दे. आमेन.

ओह, मी येशूवर किती प्रेम करतो,

211 आता फक्त त्याची स्तुती करीत राहा. जाणून घ्या, पवित्र आत्मा इथे आहे. जर तुम्ही त्याला स्वीकारत नाही, तर तो तुमचा दोष आहे.

...मी येशूवर किती प्रेम करतो,

“यापेक्षा ही अधिक तू माझ्यावर प्रेम करतोस काय?”

...येशूवर प्रेम करतो,
कारण त्याने मला पहिले प्रेम केले.

ओह, मी किती प्रेम करतो...(देवाची स्तुती असो!)
ओह, मी किती प्रेम करतो...(जर तो ह्या क्षणी आला तर काय?)
ओह, मी येशूवर किती प्रेम करतो,
कारण त्याने मला पहिले प्रेम केले.

मी त्याला कधीच सोडणार नाही,
मी त्याला कधीच सोडणार नाही,
मी त्याला कधीच सोडणार नाही,
कारण त्याने मला पहिले प्रेम केले.

अद्भूत, अद्भुत, येशू माझ्यासाठी आहे,
सल्लागार, शांतीचा राजकुमार, सामर्थ्यशाली देव तो आहे;
ओह, माझे तारण करतो, सर्व पाप आणि लज्जेपासून माझे रक्षण करतो,
अद्भुत आहे माझा मुक्तिदाता, त्याची स्तुती करा...

212 आता आपण त्याच्यासाठी गाऊया!

अद्भूत, अद्भुत, येशू माझ्यासाठी आहे,
सल्लागार, शांतीचा राजकुमार, सामर्थ्यशाली देव तो आहे;
ओह, माझे तारण करतो, सर्व पाप आणि लज्जेपासून माझे रक्षण करतो,
अद्भुत आहे माझा मुक्तिदाता, त्याच्या नावाची स्तुती करा!

213 ज्यांना असे वाटते, “आमेन” म्हणा. [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] ओह, हाल्लेलुया! मी पाहतो की काही लोक आता येत आहेत, पवित्र आत्म्यासह.

मी पूर्वी हरवलो होतो, आता मी सापडलो आहे, दोषमुक्त झालो आहे,
येशू स्वातंत्र्य आणि पूर्ण तारण देतो;
माझे तारण करतो, सर्व पाप आणि लज्जेपासून माझे रक्षण करतो,
अद्भुत आहे माझा मुक्तिदाता, स्तुती करा...

आपण आता आपले हात वर करुया आणि खरोखर स्तु–...

ओह, अद्भुत, अद्भुत, येशू माझ्यासाठी आहे,
सल्लागार, शांतीचा राजकुमार, सामर्थ्यशाली परमेश्वर तो आहे;
ओह, माझे तारण करतो, सर्व पाप आणि लज्जेपासून माझे रक्षण करतो,
अद्भुत आहे माझा मुक्तिदाता, त्याच्या नावाची स्तुती करा!

214 तुम्ही त्याला प्रेम करता का? ओह, अद्भुत! त्या रक्ताने भरलेल्या झऱ्याची स्तुती असो, जिथे पापी माणसाचा सर्व भय, सर्व दोषारोप नाहीसे होतात, आणि तो त्याच्यामध्ये मुक्त होतो. हाल्लेलुया! ओह, माझ्या प्रभू, हे खरोखर अद्भूत आहे!

215 आता आपण ते पुन्हा गात असताना, चला सर्व मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, कॅथलिक, प्रेस्बिटेरियन लोकांना, काय आहे, जेव्हा आपण हे गातो, "अद्भुत, येशू माझ्यासाठी आहे," तेव्हा चला आपण फक्त वळून हात मिळवुया, फक्त एक छान जुनी मिसळ करा. तुम्हाला माहिती आहे, मला, मला तेच आवडते. चला, आपण गाऊया जसे आपण ते करतो.

ओह, अद्भुत, अद्भुत, येशू माझ्यासाठी आहे,

216 [भाऊ डेमोस शकारियन हे भाऊ ब्रॅन्हमशी बोलतात, "भाऊ ब्रॅन्हम, मला आत्ताच राष्ट्रपति जॉन्सनविषयी समजले, हृदयविकाराच्या झटक्याने हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले, आणि कदाचित आपण त्याच्यासाठी आणि आपल्या देशासाठी प्रार्थना केली पाहिजे." कोणीतरी म्हणतो, "आपण एक मिनिट थांबूया."—सम्पा.]

...अद्भूत, येशू आहे, (ते बरोबर आहे.)
ओह, सल्लागार, शांतीचा राजकुमार,

217 [भाऊ शकारियन पुन्हा भाऊ ब्रॅन्हमशी बोलतात, "मला क्षमा करा, मला पुन्हा क्षमा करा, तुम्हाला एका मिनिटासाठी उतरायचे आहे का?" भाऊ अर्ल प्रिकेट मंडळीचे गाण्यात नेतृत्व करतात, *अद्भुत*. टेपवर रिकामी जागा. मंडळी गाते, *एक जीवनाची नदी आहे*. टेपवर रिकामी जागा—सम्पा.]

बायबल म्हणते, "जे अधिकारी आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा."

218 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही आमच्या राष्ट्राच्या नेत्यासाठी आमच्या अध्यक्षासाठी, अत्यंत गरजेच्या अवस्थेत उभे आहोत. प्रभू, कदाचित त्याला हे कधीच कळणार नाही, परंतु तू हे जाणतो. मी भाऊ जॉन्सनसाठी प्रार्थना करतो, कारण तो तुझ्यावर विश्वास ठेवणारा असल्याचा दावा करतो. आणि, पिता, आपल्याला समजले, त्याला हृदयविकाराचा झटका आला आहे. मी प्रार्थना करतो, परमेश्वर, त्याचे जीवन वाचव. आपण सध्या राष्ट्रीय संकटात, आहोतच. आणि तुझा आत्मा त्याच्यावर येऊ दे, प्रभू. आणि आता, रुग्णालयात किंवा तो कुठेही असो, आणि तुझा आत्मा त्या वॉल्टर रीड रुग्णालयात उतरू दे आणि त्याच्या शरीराला स्पर्श करून, त्याचे जीवन वाचव. प्रभू, तो व्यक्ती दबावाखाली आहे, जे आपल्याला समजते त्यापेक्षा अधिक दबाव आहे. म्हणून आम्ही प्रार्थना करतो, देवा, विश्वासी म्हणून आणि ह्या राष्ट्राचा एक भाग म्हणून, आम्ही आमच्या नेत्यासाठी प्रार्थना करतो, की तू त्याला ह्या महान क्षणी, येशू ख्रिस्ताच्या नावाने, त्याचा जीवनाची मुदत वाढवशील. आमेन.

65-0123 तुटलेली हौद
रमाडा इन
फिनिक्स, एरिझोना संयुक्त राज्य.

MARATHI

©2026 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## कॉपीराइट सूचना

सर्व हक्क राखीव. हे पुस्तक वैयक्तिक वापरासाठी होम प्रिंटरवर छापले जाऊ शकते किंवा येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यासाठी एक साधन म्हणून विनामूल्य दिले जाऊ शकते. हे पुस्तक विकले जाऊ शकत नाही, मोठ्या प्रमाणावर पुनरुत्पादित केले जाऊ शकत नाही, वेबसाइटवर पोस्ट केले जाऊ शकते, पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित केले जाऊ शकते, इतर भाषांमध्ये अनुवादित केले जाऊ शकते किंवा व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स® च्या स्पष्ट लेखी परवानगीशिवाय निधीची मागणी करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही.

अधिक माहितीसाठी किंवा इतर उपलब्ध सामग्रीसाठी, कृपया संपर्क साधा:



VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org